
अनाहुत
जगदिश खांदेवाले

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# अनाहुत

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# अनाहुत

लेखक

## जगदिश खांदेवाले

# अनाहुत

लेखक... जगदिश खांदेवाले

फ्लॅट नं ११३ शिवशंकर सोसायटी.
शिवतीर्थ नगर कोथरुड पुणे ४११०३८
मो. नं ९१५८६६१६३८
Email id – jlkhandewale@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. in
www. esahity. com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : १ नोव्हेंबर २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे




उद्यमी आणि न्याय या ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे प्रकाशित झालेल्या माझ्या दोन्ही कादंबऱ्यांना वाचकांनी उदंड प्रतिसाद दिल्याने मी ही तिसरी कादंबरी सादर करीत आहे.

आपणास ही कादंबरी पण आवडेल अशी आशा करतो.

ई साहित्य प्रतिष्ठान टीमचे व श्री सुनील सामंत यांचे विशेष आभार.

अर्पणपत्रिका

माझे नातू चि. ओजस (वय वर्षे दहा) आणि चि. विराज (वय वर्षे तीन)

यांच्या सहकार्याशिवाय मी एक शब्दही लिहू शकलो नसतो....

# कादंबरी विषयी थोडेसे




काही विशिष्ट कालावधीनंतर घटना स्वत:ची गती धारण करतात व तुम्ही फक्त साक्षीदार असता असे ब्रिगेडियर बात्रा नेहमी म्हणायचे त्याची सेकंड लेफ्टनंट राजेशला प्रचिती येऊ लागली होती.

सेकंड लेफ्टनंट राजेशला हा अनुभव इतका अनपेक्षित होता की आल्या प्रसंगाला सामोरे जात असता कर्तव्य पालनाचा आनंद पण तो व्यक्त करू शकत नव्हता.

जे काही त्याच्या बाबतीत घडत होते त्याकरता कोणालाही दोष न देता तो ज्या आत्मविश्वासाने सामोरे जातो त्याला खरंच तोड नाही.

याला तो कसा सामोरा जातो याचा हा आढावा.

जेथे जातो तेथे। तू माझा सांगाती ।
चालविसी हाती । धरोनिया ॥१॥

चालो वाटे आम्ही । तुझाची आधार ।
चालविसी भार । सवे माझा ॥२॥

बोलो जाता बरळ । करीसी ते नीट ।
नेली लाज, धीट । केलो देवा ॥३॥

तुका म्हणे आता । खेळतो कौतूके ।
जाले तुझे सुख । अंतर्बाही ॥४॥

संत तुकाराम

# अनाहूत

## लेखक : जगदिश खांदेवाले

या कादंबरीतील सर्व घटना, स्थळे व व्यक्ती काल्पनिक असून त्यांचा कोणाही व्यक्ती स्थळ वा घटनेशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग मानावा.

# सादल

मी राजेश. राजेश पवार. आमचे सादल हे हिरवेगार संपन्न गाव कोल्हापुरपासून चाळीस किलोमीटर अंतरावर आहे. गाव काही फारसे मोठे नाही. सर्व वस्ती आमच्याच भाऊबंदांची म्हणजे पवारांची आहे. लोकसंख्या जेमतेम तीन हजार आहे. सर्वच पवारांना ते करत असलेल्या व्यवसायावरून नावे पडली आहेत. जसे चाकरमाने पवार, दुधवाले पवार वगैरे. तसे माझ्या घराण्याचे नाव आहे फौजी पवार कारण उघड आहे. आमच्या घराण्यातील सर्व पुरुष मिसरूड फुटली की सैन्यात दाखल व्हायचे, तिथली नोकरी संपली की नांगर हाती धरायचे.

माझ्या बाबतीतही काही वेगळे घडायची शक्यता नव्हती. साधारण पणे १९६७ साली, त्यावेळची मॅट्रीक परीक्षा पार झाल्याबरोबर आबांनी म्हणजे माझ्या आजोबांनी मला NDA चा फॉर्म भरायला सांगितले. अपील वगैरे करण्यात तसा काहीच अर्थ नव्हता, तरीपण मी मला इंजिनियरिंग शिकायचे आहे असे सांगून बघितले. त्यावर तिथला बॉन्ड संपल्यावर काय करायचे ते कर असे लष्करी खाक्यातले उत्तर मिळाले. माझी सेनेत जायची इच्छा नव्हती असे नाही, पण मला आपले उगीच वाटायचे की लष्करात

आपली विचारशक्ती वापरायला जास्त वाव मिळत नाही. किंचित नाखुश असलो तरी मी एकदा हाती घेतलेले काम नेहमीच नेटाने करतो. त्यानुसार मी अभ्यासात अजिबात हयगय केली नाही. परीक्षा होई पर्यंत कोल्हापूरलाच मुक्काम केला. जेवढे मार्गदर्शन, क्लासेस वगैरे करता येतील तेवढे केले व NDA ची परीक्षा पार झालो. तीन वर्षांचे खडतर प्रशिक्षण झाल्यावर मी 'सेकंड लेफ्टनंट' या शिकाऊ श्रेणीत मद्रास रेजीमेंटला रूजू झालो. ते वर्ष होते १९६९. या उमेदवारी काळात मी कमांडो प्रशिक्षणाचा विकल्प दिला. बऱ्याच कठोर चाचण्यानंतर माझी याकरता निवड झाली व चेन्नईला प्रशिक्षण सुरू झाले.

आतापर्यंतचे परिश्रम काहीच नव्हते असे पहिल्या आठवडयातच मला जाणवायला लागले. १०० किलोमीटर अंतर २५ किलो वजन घेऊन चालणे, धावणे, पाव लिटर पाण्यावर संपूर्ण दिवस-रात्र काढणे असे खडतर जीवन होते. कोणतीही निरूपद्रवी वस्तू घातक शस्त्र म्हणून कशी वापरता येते, सदैव दक्ष राहणे म्हणजे काय असते हे किंचित मासले झाले. पण एक गोष्ट मात्र नक्की की यामुळे तुमचा आत्मविश्वास प्रचंड वाढतो. एखाद्या ऑलिंपीक पदक विजेत्याला हेवा वाटेल अशी तुमची शरीरसंपदा होते. हे सर्व परिश्रम घेत असतांना रोज रात्री पाठ टेकतांना असे वाटायचे की

कोणत्या वाईट क्षणी आपण हा पर्याय दिला. क्वचित असेही वाटायचे की हे सर्व कधी उपयोगात येईल? ते चाळीस आठवडे माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण क्षण होते. पण तेच मला आयुष्यभर पुरले. १९७० च्या मध्यात मला आमच्या कमांडिंग ऑफिसरने भेटण्यास बोलावले. कमांडिंग ऑफिसरने भेटायला बोलावणे ही सैन्यात एक दुर्मिळ घटना असते. सरळ मुद्द्यावर येत लष्करी खाक्या नुसार त्यांनी अगरताला येथे ब्रिगेडियर बात्रांना ताबडतोब रिपोर्ट करण्यास सांगितले.

ब्रिगेडियर बात्रा हे एक विलक्षण व्यक्तिमत्व होते. प्रथमभेटीतच स्वत:बद्दल समोरच्याचे मत खराब होईल याची ते पूर्णपणे काळजी घेत. गोरापान वर्ण, किंचित स्थुलतेकडे झुकणारी शरीरयष्टी, सव्वा सहा फूट उंची, खास खर्जातला आवाज या निसर्गदत्त देणग्या त्यांना लाभल्या होत्या. गोल भिंगाच्या सोनेरी बारीक काड्याच्या चष्म्यातून जगाचे चौफेर निरीक्षण करणारे बारिक लुकलुणारे डोळे, यामुळे समोरचा माणूस अनावधानानी त्यांना कमी लेखण्याची चूक करित असे. पण या फसव्या व्यक्तिमत्त्वा मागे एक कुशाग्र मेंदू सतत जागृत व कार्यरत असतो हे त्यांच्या संपर्कात आलेले सर्वजण जाणून होते. त्यामुळेच त्यांना सर्वत्र मान मिळत असे. माझी व त्यांची पहिली मुलाखत सेनेच्या

मुख्यालयात झाली. “ये राजेश, मी तुझीच वाट पाहत होतो. ” असे शुद्ध मराठीत त्यांनी माझे स्वागत केले. माझ्या चेहऱ्यावरिल आश्चर्य बघताच ते अगदी सहजगत्या म्हणाले की मराठी, गुजराती, बंगाली या भाषापण त्यांना चांगल्या येतात म्हणजे द्राविड पंचभाषांशिवाय. हा पण खुलासा त्यांनी लगेच केला.

" सर, अजून कोणत्या भाषा तुम्हाला येतात?" न राहवून मी विचारलेच. "इंग्रजी आणि रशियन. ' ते शांतपणे उत्तरले आणि हो तुला सांगायचे राहिलेच, उद्यापासून तुला माझ्याबरोबरच राहायचे आहे. तेही नागरी वेषात, तसेच हे लष्करी रीतिरिवाज वगैरे सर्व बाद समजले?. "

दुसऱ्या दिवशी माझ्याशिवाय अजून तिघेजण आलेले होते. बात्रांनी थोडक्यात प्रोजेक्ट समजावून कामाची रूपरेखा विशद केली. परिस्थिती आम्हाला माहीत नव्हती असे नाही पण इतक्या सुसंगतपणे कोणी सांगीतली नव्हती इतकेच.

बात्रांच्याच शब्दात सांगायचे झाले तर मुळात भारताची फाळणी हिच एक मोठी चूक होती. त्यातही पाकिस्तान ची निर्मिती संपूर्णपणे अनैसर्गिक होती. केवळ धर्माच्या पायावर आणि इतक्या कमी कालावधीत एक नवीन देश तयार करायची घाई टाळता आली असती. असो, घडलेल्या घटने वर आपण काही करू शकत

नाही, झाले ते झाले अशी टिप्पणी करीत ते पुढे म्हणाले इंग्रजांनी केलेली चूक सुधारण्याची संधी नियतीने आपल्याला दिली आहे.

पाकिस्तानच्या निर्मितीपासूनच पूर्व पाकिस्तानला सापत्न वागणूक देणे सुरू झाले होते. जसे मुलकी व लष्करी दलांमध्ये दुय्यम प्रतिनिधित्व, विलंबित सरकारी योजना, अपुरी सरकारी मदत वगैरे. त्यामुळे विचारवंत आणि सामान्य नागरिक कमालीचा प्रक्षुब्ध आहे. त्यातच बंगाली भाषेची गळचेपी केल्याने त्यांच्या बंगाली अस्मितेवर घाव बसला आहे. त्यामुळे ते उठाव करण्याच्या मनस्थितीत आहेत. त्यांना आपल्याला पावसाळा सुरू व्हायच्या आत प्रशिक्षित करायचे आहे. "

" सर, हे सर्व करण्याऐवजी आपण आताच का पूर्व पाकिस्तान मुक्त करू नये?"मी विचारले.

“दोन गोष्टी करता” बात्रा उत्तरले, "एकतर युद्ध ही एक महा खर्चिक बाब आहे. आपण आत्ता काही कृती केल्यास विजयी ज़रूर होऊ, पण हानी खूप होईल, म्हणून आपल्याला झटपट संपणारे युद्ध करायचे आहे. त्याकरता हे प्रशिक्षण. दुसरे म्हणजे आतापर्यंतचा इतिहास साक्षी आहे की, आपण कधीही आक्रमण केलेले नाही. म्हणून आपण अशी कोणतीही कृती करायची नाही

की ज्यामुळे युद्ध सुरू होईल. शेवटी प्रत्येकाला आपली लढाई स्वत:च लढायची असते. "

दुसऱ्या दिवसापासून आमचा प्रवास आणि वनवास सुरू झाला. निरनिराळ्या केंद्रांना प्रशिक्षित करणे. वेळ पडल्यास त्यांच्याबरोबर गनिमी हल्ल्यात भाग घेणे. त्यांच्यात योग्य तो समन्वय साधणे. यात आम्ही सर्व इतके मग्न झालो की केव्हा पावसाळा सुरू झाला हे पण कळले नाही. या दरम्यानच बात्रा हे गुरिल्ला वॉरफेअर मधील एक निष्णात तज्ञ आहते हे पण कळून चुकले. जसे जसे पूर्व पाकिस्तानी नागरिक दले (ज्यांना आता मुक्ती वाहिनी म्हणून संबोधण्यात येत होते) या तंत्रात निष्णात व्हायला लागली, तसे तसे बात्रांनी हळूहळू संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपवायला सुरुवात केली.

आपले सैन्य जेव्हा कारवाई करेल तेव्हा यांनी आतून उठाव करून आपल्याला युद्ध लवकर संपवण्यासाठी मदत करावी ही त्यांची मूळ रूपरेखा होती.

विविध कारवायांमधे प्रत्यक्ष भाग घेतल्याने तसेच याह्याखानच्या सैन्याने केलेले अन्वनीत अत्त्याचार प्रत्यक्ष बघितल्याने म्हणा, नकळत माझ्यात एक बदल झाला होता. तो म्हणजे मी संवेदनाहिन होवू लागलो होतो. दया-माया या गोष्टी

माझ्या मनातून हद्दपार होऊ लागल्या होत्या. कदाचित बात्रांना पण हा माझ्यातील बदल जाणवला असावा. म्हणनू एक दिवस (जुलै १९७१) त्यांनी मला बोलावून घेतले व सांगितले की उद्यापासून आपण दिल्लीत काम करायचे.

# दिल्ली

दिल्लीतील कामाचा प्रकार आतापर्यंतच्या कामाच्या पेक्षा पूर्णपणे वेगळा होता. येथे बात्रा विविध राजनैतीक वर्तुळात वावरायला लागले. तेही इतक्या सहजतेने की ही व्यक्ती गुरिल्ला वॉरफेअरमधे तज्ञ आहे, बिकट युद्ध प्रसंगी मात करण्यात निष्णात आहे, हे कोणालाही सांगूनपण खरे वाटणार नाही. अर्थात् ते पूर्व पाकिस्तान (आता बांगलादेश म्हणून संबोधन वापरायला सुरुवात झाली होती) स्वतंत्र झाल्यावर त्याला कोणते देश, समाजातील मान्यवर, बुद्धिवंत मान्यता देतील, या दृष्टीने त्यांची पूर्वतयारी सुरू असावी. हा अर्थात् माझा एक अंदाज होता. त्यांनी तसे कधी स्पष्ट सांगितले नाही. मी पण विचारले नाही. हेरगिरीचे जाळे विस्तारीत करण्याची पण शक्यता होतीच. येथील माझे एकमेव काम म्हणजे बात्रांचे रक्षण करणे एवढेच होते.

अशातच एक दिवस ते फारच चिंताक्रांत दिसले. आम्ही मुख्यालयात जात होतो. परत येतांना ते सहजगत्या मला म्हणाले, "राजेश, मी सांगेन ते तू करशील काय?"

" का नाही, You are my Boss. "

" मी वरिष्ठ, कनिष्ठ या नात्याने नाही म्हणत. "

"मग?"

"मी एक फार मोठा डाव खेळणार आहे. जर जिंकलो तर प्रश्नच नाही पण जर काही विपरीत घडलेच तर मला तुझी मदत लागेल. "

" सर, माझ्यावर विश्वास ठेवा. "

अजून काहीतरी सांगण्याचा त्यांचा विचार होता पण तेवढयात मेन गेट आले आणि ते गप्प झाले. रात्री दहा वाजता ते अचानक मला म्हणाले, " चल आपल्याला हॉटेल डायमंड ला जायचे आहे." “काय? कशाला?” असे विचारायची पद्धत नव्हतीच. त्यामळ्ुे मी निमूटपणे गाडीत बसलो. हे एक फाईव्ह स्टार हॉटेल असून अती उच्चपदस्थांची त्यात वर्दळ असते, एवढेच मी ऐकून होतो. पार्किंग लॉटच्या बऱ्याच आधी ते उतरले. मला गाडी पार्क करायला सांगून त्यांनी त्यांच्या व माझ्या घडयाळाची वेळ एक करून घेतली. नंतर मला ते शांतपणे म्हणाले यानंतर बरोबर वीस मिनिटांनी तू मला रुम नं १०१ मधे भेट. मी गाडी पार्क करून परत रिसेप्शनला येईपर्यंत ते गेले पण होते.

आम्ही दोघेही साध्या वेशात असल्याने कोणी विशेष लक्ष दिले नाही. साधारणपणे १०/१५ मिनिटे मला रेगांळतांना बघून

रिसेप्शनिष्ट माझ्याकडे रोखून बघू लागली. तेवढयात वीस मिनिटे झाल्याने मी पटकन रुम नं १०१ कडे निघालो.

रुम नं. १०१ चे दार किंचित उघडे होते. दरवाजा उघडून मी आत गेलो. सूट फारच प्रशस्त होता. दार हळूच उघडतांना बघून समोरच्या सोफ्यावर बसलेले बात्रा हलकेच म्हणाले, "बरे झाले राजेश तू वेळेवर आला. आता पटकन दार लाव व माझ्यासमोर येऊन बस. " त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी केले. सूट मधील मंद प्रकाशाला माझी दृष्टी जेंव्हा सरावली तेंव्हा माझ्या लक्षात आले की त्यांच्या हातात पिस्तूल होते व साधारण सहा सात फुटावर एका पन्नाशीतल्या भपकेबाज पेहरावातल्या माणसाचे प्रेत पडले होते. त्याला बात्रांनी पॉईट ब्लँक अंतराहून गोळी घातली असावी.

मी काही विचारायच्या आतच बात्रांनी सांगायला सुरुवात केली. त्यांचा स्वर थोडा खिन्न वाटत होता.

"माझा नाईलाज होता राजेश. त्यानी मला डबल क्रॉस करण्याचा प्रयत्न केला. "

"मी समजू शकतो सर. "

" तो कोण आहे, सॉरी, होता, तुला कल्पना आहे?"

"नाही सर. "

" रफिक, पाकिस्तान वकिलातीचा उच्च पदस्थ अधिकारी !”

“ ओ हो, मग तर फारच गंभीर प्रकरण आहे. ”

“हो, सध्याच्या परिस्थितीत तर पाकिस्तानच्या हातात कोलीत दिल्यासारखे होईल. ”

यावर पण हो म्हणण्यापलीकडे मी काय करू शकत होतो.

“भारत सरकार तर आपल्याला चुकूनही पाठीशी घालणार नाही. कारण हे मिशन पूर्णपणे अनधिकृत आहे. ”

मी परत सहमती दर्शविली.

“ सर, समजा मी या प्रेताची विल्हेवाट लावली तर?”

“काही उपयोग नाही. पोलीस सहज आपल्या पर्यंत पोहोचतील. ”

“मग?”

"सध्याच्या परिस्थितीत मला एकच मार्ग सुचतो. पण त्याकरता तुझे सहकार्य अपेक्षित आहे. ”

" तुम्ही फक्त सांगा. "

"नीट शांतपणे ऐक. नंतर काही शंका असल्यास विचार, तू नकार पण देऊ शकतोस!'

“Yes sir. "

"या घटकेला तरी मला अटक होणे किंवा माझी चौकशी होणे, त्यात मी गुंतून पडणे म्हणजे कालापव्यय होईल. तसेच मी सुरू केलेल्या सर्व कामांवर विपरीत परिणाम होईल. "

"मला कल्पना आहे. "

" म्हणून मला वाटते की, या खुनाची जबाबदारी तू स्वतःच्या शिरावर घेऊन फरार व्हावे. "

यावर काय बोलावे हे मला क्षणभर सुचलेच नाही. पण परत बात्रांनीच बोलायला सुरुवात केली.

"हे बघ, हे सर्व प्रकरण मी तुझ्यावर ढकलतो आहे असे समजू नको. हा खून माझ्या हातून झाला आहे. हे मी कधीही नाकारणार नाही."

"सर, पण माझे काय? माझे कोर्ट मार्शल होईल, मला फरार घोषीत करतील, माझी कारकीर्द सुरू व्हायच्या आधीच संपेल."

"यातले काहीएक होणार नाही. कोर्ट मार्शल होईल त्या वेळी तू माझा संदर्भ दे. मी स्वत: येउन सर्व जबाबदारी घेईन व तुझी निर्दोष मुक्तता होईल हे मी बघेन. हा माझा शब्द आहे. " बात्रा म्हणाले, “पण कमीत कमी चार महिने तरी पोलिसांना सापडू नकोस, तेवढा प्रशिक्षित तू नक्कीच आहे. ”

“चार महिन्यांनी असे विशेष काय होणार आहे?”

“युद्ध” बात्रा शांतपणे उत्तरले.

मी परत विचारात पडलो; मग धीर धरून विचारले, ” सर, होऊ नये, पण समजा याच कालावधीत जर तुमचे काही बरेवाईट झाले तर, माझा शेवट निश्चित नाही काय?”

“Good Question “बात्रा होकारार्थी डोके हलवीत म्हणाले, “याचा विचार मी आधीच केला आहे. झालेली घटना मी विस्तारपूर्वक लिहून, एक प्रत माझ्या वरिष्ठांकडे, एक लष्करी मुख्यालयात व एक प्रत माझ्या पत्नीकडे उद्याच देईन. माझ्या पश्चात फक्त तू मागितल्यासच ती ते तुला देतील. अशी स्पष्ट सूचना पण त्यांना देईन. अजून काही?”

’आलिया भोगासी’ असा विचार करून मी नकारार्थी मान हलवली.

“आता माझ्या काही सूचना नीट ऐक, ”बात्रा म्हणाले “फरारी होतांना ज्या साधारण चुका होतात त्या तू टाळ. उदाहणार्थ परदेशी जाणे, मोठया शहरात जाणे जे रूटीनने पोलीस सहज जाणू शकतात. अशाच प्रांतात जा जेथे तू सहज मिसळू शकशील म्हणजे दक्षिणेचे प्रांत वर्ज्य, कळले?”

“ कळले.”

'"तसेच कोणत्याही वादात, भांडणात मारामारीत सहभागी होऊ नकोस, पोलीस केस होईल अशी कोणतीही गोष्ट करू नकोस. वेळेवर जे योग्य वाटेल ते कर, Ok, Best of Luck."

"I need it. "

"आणि माझ्यावर विश्वास ठेव, पण संपर्क करण्याचा प्रयत्न करू नकोस. अर्थात् हे सर्व निवळे पर्यंत !"

"Yes Sir. " असे म्हणून मी क्षणभर डोळे मिटले आणि उघडले तेव्हा बात्रा निघून गेले होते.

मी सूटची किल्ली शोधली हळूच दार उघडले व कॉरिडॉर वर एक नजर टाकली. कोणीच नव्हते. तसाच बाहेर आलो, दरवाजा लॉक केला. लिफ्ट कडे जातांना लाँड्री अशी पाटी असलेली एक लहान रूम दिसली. तेथे भरपूर चादरी, टॉवेल, अभ्रे वगैरे पडले होते. मी त्या पसाऱ्यात किल्ली फेकली. चार लिफ्ट होत्या. त्यातील एकात शिरलो व खाली जात असतांना मला बेल बॉय व सिक्युरिटी रुम नं १०१ कडे पळत जातांना दिसले.

## सज्जनपूर

मी रिसेप्शनिस्टला जाणवेल अशा रीतीने वेगाने हॉटेलबाहेर आलो. समोरून येणाऱ्या पहिल्याच टॅक्सीला हात केला व रेल्वे स्टेशनला चलण्यास सांगितले. काहीशा विचित्र नजरेने त्याने माझ्याकडे बघितले. काय झाले असे विचारताच तो म्हणाला आताशीच 12 वाजलेत आणि 2 वाजल्या शिवाय कोणतीच ट्रेन नाही. तुम्ही पायी गेलात तरी तासाभरात पोचाल. जास्त संभाषण वाढवण्यात अर्थ नव्हता म्हणून मी त्याला जास्त बडबड न करता मला ड्रॉप कर ऐवढेच रागात सांगितले. माझ्या स्वरावरून काय समजायचे ते तो समजला व 'ठीक आहे, मला काय त्याचे' असे स्वत:शीच म्हणत खांदे उडवून गाडी चालवू लागला. अर्ध्या तासात त्याने मला स्टेशनवर सोडले.

इंडिकेटरवर जयपूरला जाणारी ट्रेन दोन वाजता प्लॅटफॉर्म नं ३ वर येणार असल्याचे वारंवार दाखवण्यात येत होते. विशेष विचार न करता मी जयपुरचे तिकीट काढले व प्लॅटफॉर्म नं ३ कडे निघालो. अजून तब्बल दीड तास असल्याने प्लॅटफॉर्मवर विशेष गर्दी नव्हती. उतरत्या जिन्यालगत एक मोठा लाकडी बाक रिकामा होता. त्यावर

बसून मी झालेल्या घटनेचा शांतपणे विचार करू लागलो जो करायला मला आतापर्यंत अजिबात वेळ मिळाला नव्हता.

बात्रा बोलल्याप्रमाणे वागतील या विषयी माझ्या मनात अजिबात शंका नव्हती. तसेच त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी असल्याने त्यांनी घेतलेला हा निर्णय जरी माझ्यावर अन्याय करणारा वाटत असला तरी योग्य होता.

या निष्कर्षावर आल्यानंतर मला थोडे मोकळे वाटू लागले. अजून तीन दिवस तरी पोलिसांचा ससेमिरा सुरू होणार नाही असे मला उगीच वाटले, कारण बात्रा शक्य तेवढा कालापव्यय करतील अशी मला खात्री होती. तसेच जयपूर तसे बऱ्यापैकी मोठे शहर आहे. तेथे आपण २/४ महिने सहज काढू हाही विचार मनात डोकावला. मी प्लॅटफ़ॉर्मवर आणि बाजूच्याच जिन्यावर एकदा नजर फ़िरवली व त्या लाकडी बाकावर थोडा ऐसपैस पसरलो. तेवढयात मी इथे बसू शकतो काय असा प्रश्न मला कोणी तरी विचारला. कोण विचारत आहे म्हणून मी बघितले तर साधारणपणे माझ्याच वयाचा एक चांगल्या पेहरावातील तरूण मला विचारत होता.

“ जरुर” असे म्हणत मी किंचित सरकून त्याला जागा करून दिली.

मी माझ्याच विचारात इतका गढून गेलो होतो की गर्दी बरीच वाढल्याचे माझ्या लक्षात पण आले नव्हते.

"कोठे जयपूर काय?" त्याने विचारले.

" होय" मी त्रोटक उत्तर दिले

"सामान दिसत नाही?"

"मित्राकडे आहे. " एवढयाने त्यांचे समाधान झाले असावे.

"गाडीला अजून वेळ आहे. " तो म्हणाला. माझे मौन.

"मी पण जयपुरचाच आहे. दिल्लीत करवा इनफ्रां मध्ये सेल मॅनेजर म्हणून होतो. "

"म्हणजे?" मला फक्त माझ्या संदर्भात प्रश्न नको होते.

" म्हणजे या आठवडयात नोकरी सोडणार व स्वत:चा व्यवसाय सुरू करणार. "

"फारच छान! All the best. "

"Thanks, आता आईला भेटायला चाललो आहे. ती चारी धाम यात्रेला परवा जात आहे. " याचा चौकसपणा बघून मला पण यात्रेला जावेसे वाटू लागले. हा माझ्याबद्दल विचारायला लागला, तर आपली काय अवस्था होईल याचा मी विचार करू लागलो.

तेवढयात त्याने खिशातून व्हिजिटिंग कार्ड्स चा एक बॉक्स काढला व माझ्या हातात ठेवित म्हणाला, “ बिझिनेस करता लागतील म्हणून कालच प्रिंट करून घेतली. बघा जरा कशी आहेत.”

त्याचा हिरमोड कशाला करायचा या विचाराने मी तो बॉक्स घेतला व त्यातले कार्ड वाचू लागलो. त्यावर विनय कश्यप B. E. (Civil) Supplier of all types of building materials\ we undertake all type of civil construction & design works वगैरे बरेच काही लिहिले होते. मी बारकाईने वाचत असल्याचे बघून विनय खुश झाला. “मला वाटलेच होते की तुम्हाला आवडेल.” असे म्हणून मी जरा आपल्याकरता चहा आणतो. तोवर तुम्ही नीट वाचा व काही सूचना असल्यास जरूर सांगा असे म्हणत चहा आणण्यास गेला.

मी कार्ड्स निरखून बघत असतांना अचानक जिन्याच्या वरच्या बाजूने कोलाहल ऐकू आला. मी वर बघताच एक व्हीलचेअर, ज्यात एक विकलांग व्यक्ती बसली होती जोराने खाली घसरत येतांना दिसली. बहुधा सहायकाच्या हातून निसटली असावी. पण ती इतकी वेगात येत होती की जर अडवली नाही तर

सरळ प्लॅटफॉर्म वरून रूळावर गेली असती आणि ट्रेन हळूहळू येऊ लागली होती.

क्षणाचाही विचार न करता मी व्हिजिटिंग कार्ड्स चा बॉक्स खिशात ठेऊन वेगाने व्हीलचेअर अडविण्याकरता धावलो. इथे माझे प्रशिक्षण कामी आले. कारण मी साधारणपणे अर्ध्या जिन्यातच व्हीलचेअरपाशी पोचलो पण अपेक्षेपेक्षाही तिचा वेग जास्त होता. मी दोन्ही हात तिच्या हॅन्डल वर ठेऊन तिला मागे रेटण्याचा प्रयत्न केला. पण या गडबडीत माझा तोल जाऊन माझे डोके जिन्याच्या रेलींगवर जोरात आदळले. त्यामळु व्हीलचेअर माझ्या पायावरून उलटली व तीचा वेग कमी होऊन कठड्याला धडकून थांबली.

एव्हाना बाकीचे लोकपण मदतीला धावले. त्यांनी प्रथम व्हीलचेअर नीट उचलली, त्या विकलांग व्यक्तीला त्यात नीट बसवले व प्लॅटफॉर्मवर नेउन ठेवले. काही जण माझ्या मदतीला धावले पण एव्हाना मी बेशुद्ध होत होतो. मला एवढेच आठवते.

त्यानंतर जेव्हा मला जाग आली तेव्हा मी एका प्रशस्त खोलीत एका डबल बेडवर पहुडलोहोतो. माझे डोके असह्य दुखत होते. डोळे जड झाले होते. तहान पण फार लागली होती, पण तोंडातून शब्दही फुटत नव्हता. माझ्या कानी फक्त एका स्त्रीचे वाक्य

पडले. ती बहुतेक घरच्या नोकराशी बोलत असावी. ‘‘बद्री, तुला एकपण काम नीट करता येत नाही’’ असे काहीसे ती रागात म्हणतांना मी ऐकले तेवढ्यात परत माझी शुद्ध गेली.

त्यानंतर परत मला जेव्हा जाग आली तेव्हा खोलीत बराच उजेड होता म्हणजे सकाळ झाली असावी. आता माझे डोके दुखणे थोडे कमी झाले होते. कसेबसे उठून बसण्याचा मी प्रयत्न करू लागलो. मला तसे करतांना पाहून एक युवती जी तेथेच होती मला थांबवत म्हणाली, ‘‘तुम्ही अजिबात हालचाल करू नका. डॉक्टरनी मनाई केली आहे. ’’ मी पाण्याची खूण केली. पाणी देतांना मला तिने विचारले, ‘‘आता तुम्हाला कसे वाटत आहे?’’ मला अजूनही जीभ जड झाल्याने नीट बोलता येत नव्हते. तरीही मी प्रयत्नपूर्वक म्हणालो ‘‘मी कुठे आहे?’’

‘‘ सज्जनपुर’’

‘‘मी तर….. ’’

‘‘हो, तुम्ही जयपूरला जाणार होता. पण काकांना वाचवतांना तुमच्या डोक्याला व पायाला लागले. त्यामळु आम्ही तुम्हाला येथे आणले. ’’ पायाच्या वेदना मला जाणवल्या नव्हत्या म्हणून मी पायाकडे बघताच ती म्हणाली, 'पायाला फारसे लागले नाही, फक्त हेअरलाईन क्रॅक आहे. ’’

“ तुम्ही?”

“मी कविता. मी, काका व सविता माझी बहिण, काकांना घेऊन येत असतांना बद्रीच्या गलथानपणामुळे हा अपघात घडला.”

“पण….. ”

“पण बीण काही नाही. आता तुम्ही फक्त आराम करा आणि हो घरची काही काळजी करू नका हो विनय.” मला परत गरगरायला लागले.

## मार्बलगंज

दुसऱ्या दिवशी मला बरीच हुशारी वाटू लागली. डोके दुखणे पूर्ण थांबले होते. सकाळी १० च्या सुमारास डॉक्टर आले. त्यांनी तपासून चार दिवसात पूर्णपणे ठणठणीत होशील, असा विश्वास व्यक्त केला. तसेच डाव्या पायावर जोर न देता चालायला हरकत नाही, हे ही सांगितले. हे सांगत असतांनाही अर्थात् कविता हजर होती.

डॉक्टर जाताच मी कविताजवळ काकांना म्हणजे वेलजीभाईना भेटायची ईच्छा व्यक्त केली.

“हो, हो, का नाही? त्यांना पण तुम्हाला भेटावे असे वाटत असेलच की” ती म्हणाली.

“वाटत असेल म्हणजे, ते काही म्हणाले नाहीत?”

“नाही, चार वर्षांपूर्वी झालेल्या अपघातामुळे ते विकलांग झाले आहेत. ते हालचाल करू शकत नाही तसेच बोलू पण शकत नाही. ”

“सो s s, सॉरी, तरीपण मला त्यांना भेटायला आवडेल. ”

आम्ही दोघेही त्यांच्या खोलीकडे जाऊ लागलो.

खोलीत व्हीलचेअर वर वेलजीभाई बसले होते व एक नोकर बेडशीट बदलत होता.

“हा बद्री, हाच काकांचे सर्व बघतो.” बद्री हे नाव ऐकल्या सारखे वाटले. पण कोठे ते आठवत नव्हते.

वेलजीभाई विकलांग जरूर होते, पण एकेकाळी ते राजबिंडे असावेत. त्यांचे राजबिंडेपण जरी सध्याच्या अवस्थेत ओसरले असले तरी सर्व तेज त्यांच्या टपोऱ्या निळ्या डोळयात साठवले होते. माझ्या आतापर्यंतच्या आयुष्यात इतके तेजस्वी डोळे मी बघितले नव्हते. ते कार्यरत असतांना नक्कीच केवळ नजरेनेच काम करून घेत असतील असा विचार माझ्या मनात चमकून गेला.

आम्हा दोघांनाही बघून त्यांचे डोळे हर्षाने लुकलुकले.

“काका, हे विनय, तुम्हाला भेटायला आलेत”

निळ्या डोळयात कृतज्ञतेची छटा तरळली जी मला सहज वाचता आली.

“त्यात मी काय विशेष केले?”

“म्हणजे? तुम्हाला कळले काकांना काय म्हणायचे?”

“होय त्यांत काय विशेष, त्यांचे डोळे विलक्षण बोलके आहे, आणि हो माझ्याशी एकेरीतच बोल!”

'ठीक आहे. मलापण अजून काकाशी नीटसा संवाद साधता येत नाही आणि तू पहिल्या भेटीतच सहज सांगत आहे ' किंचित खांदे उडवून मी हा माझा प्रांत नसल्याचे सूचित केले. 'काका, मी आता पूर्ण बरा झालो आहे. उद्या मी येथून निघावे म्हणतो. '

निळ्या डोळयात विषादाची छटा जाणवली.

"नाही, तू अजून पूर्ण बरा नाही झाला. डॉक्टरांनी चालायची परवानगी दिली म्हणजे तू पूर्ण बरा झाला असे नाही. "कविता जोरात म्हणाली, "अजून एक आठवडा तरी येथेच आराम कर. "

निळ्या डोळयात किंचित आर्जवाची छटा आली.

"कोण कुठे चाललय?" सविता आत येत म्हणाली. हाच आवाज मी बद्रीवर रागावतांना ऐकला होता, मला एकदम आठवले.

मी पहिल्यांदाच कविता व सविता या दोघींना एकत्र बघत होतो. केवळ रंगाचा फरक सोडल्यास जुळयांमधे असावे तेवढे साम्य दोघीत होते. म्हणजे कविता किंचित सावळी होती. तर सविता गोरी. सविताचे सौंदर्य बरेचसे आक्रमक होते, तर कवितांचे सौंदर्य शालीनतेकडे झुकणारे होते. कवितांचे बोलणे पण मृदू होते तर सविता बेफीकीरपणे बोलायची. तसेच बोलण्यात फटकळपणा जाणवायचा.

“काही नाही, विनय जायचे म्हणत आहे. ”

“मग जाऊ दे की. त्यांना पण त्यांची काम असतीलच की. ”

“असे कसे ताई, अजून तो पुरता बरा पण झाला नाही. ”

“हो का, मग थांबा हो विनय “ असे म्हणत आपण परक्या माणसासमोर बोलत आहो याकडे पूर्ण दुर्लक्ष करीत ती सरळ वेलजी भाईंना म्हणाली “काका, मग काय तुम्ही विलचे काय ठरविले? एकदा काय ते लवकर फायनल करा. परत असा अपघात झाल्यास दरवेळी विनय सारखा कोणी भेटेलच असे नाही. ”

निळ्या डोळयात विषाद दिसला.

“ सविता, काय हे आणि कोणासमोर बोलते?”

“त्यात काय विशेष, कधी ना कधी हे बोलायलाच हवे”असे म्हणत फणकाऱ्याने सविता निघून गेली.

आपले गृहछिद्र अशाप्रकारे माझ्यासमोर अचानक उघडे पडल्याने कविता जरा खिन्न झाली होती. पण लगेच स्वत:ला सावरीत म्हणाली की, “चल मी तुला घर दाखवीते. तेवढाच तुला चालायचा पण व्यायाम होईल. ” निळ्या डोळयात समाधान दिसले.

घर कसले, तीन मजली हवेलीच ती! ती दाखवितांना कविताने अजून बरीच माहिती दिली. हवेली जरी हिंदी सिनेमात दाखवतात तशी भव्य दिसत असली तरी रयाहीन वाटत होती. गॅरेजमध्ये एक ॲम्बेसेडर व एक व्हेस्पा धूळ खात पडली होती. हे सर्व असे का हे सांगतांना कविता म्हणाली की चार वर्षापूर्वी झालेल्या अपघातात वेलजींचा एकुलता एक मुलगा अवी गेला, वेलजी विकलांग झाले व व्यवसायाची दुर्दशा झाली. देणेकऱ्यांनी देणी बुडविली व बँकेचे हप्ते थकल्याने आता जप्ती पर्यंत वेळ आली होती. सविता व कवितांचे आईवडिल लहानपणीच गेल्याने वेलजीच त्यांचे सर्वस्व होते. जेंव्हा सर्व व्यवस्थित होते तेंव्हा त्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले आणि कसलीच आबाळ होऊ दिली नाही. पण अपघाताच्या व अवीच्या जाण्याने ते पूर्ण खचले होते.

“पण सविता विलचे काय म्हणत होती?”

“ते होय, वेलजींचा १० लाखाचा विमा आहे. त्याचे नॉमीनी म्हणून तिला नोंदवावे म्हणून. ”

“हे करण्याऐवजी व्यवसाय सावरण्याचा प्रयत्न का करत नाही?”

“विनय, आमचा समाज फारच रुढिप्रिय आहे. आम्हाला पदवी पर्यंत शिकवले हेच अजून बऱ्याच जणांना खुपत आहे. ”

“ मग तुम्हाला शिकवण्याचा उपयोग काय आहे? तसा बिझिनेस तर तुमच्या रक्तातच आहे. ”

“ तू म्हणतो त्यात तथ्य आहे. तू मदत करशील तर त्याला पण माझी तयारी आहे. ”

“ मी काय मदत करणार आहे?”

“हे बघ तुझ्याकडे सिव्हिल डिग्री आहे. तिचा उपयोग आमच्या साठी केला तर?"

“माझ्या डिग्रीचे तुला कसे कळले?”

“ तुझ्या व्हिजिटिंग कार्ड्स वरून” कविता म्हणाली “त्या ज्ञानाचा उपयोग तू सध्या आमच्याकरता कर व बरोबरीने मलापण शिकव. तुला जेव्हा योग्य वाटेल तेव्हा तू स्वत:चा व्यवसाय सुरू कर. एक डबघाईला आलेला व्यवसाय आपण सुरळीत करू शकतो हा एक अनुभव तुला मिळेल!”

मी अजून NDA मोडमधेच होतो. त्यामुळे कविता मला विनय समजून बोलत आहे हे समजायला मला जरा वेळ लागला.

“पण समजा मला नाही जमले तर?”

“नाही म्हणून कोणत्याही कामाची सुरुवात करू नये. तसे केल्यास ते खात्रीने फिसकटते. ”

'"असे वेलजीभाई म्हणतात!" मी सहजगत्या म्हणालो.

दुसऱ्या दिवशी सकाळी कविताने हा विचार सर्वांसमोर ठेवला तेव्हा घरच्यांशिवाय वेलजींचे दिवाणजीपण हजर होते. साधारण पन्नाशीचा हा गृहस्थ वेलजींचा उजवा हात असावा हे जाणवत होते. साडेपाच फूट उंची, स्थूल शरीरयष्टी, गोरापान वर्ण, मृदू बोलणे, साधे, स्वच्छ धुतलेले कपडे, एकूण सेवाभावी वृत्ती असे व्यक्तिमत्त्व म्हणता येईल. बँकेकडून महिन्याची मुदत वाढवून मिळाल्याचे तसेच मार्बलगंज मधील फॅक्टरी बशीर मुळे बंद असल्याचे त्यांनी सांगितले.

"फॅक्टरी जर बंद राहील तर या मुदतवाढीचा काय उपयोग?"सविता म्हणाली.

" फॅक्टरी तर गेले चार महिने बंदच आहे. मी फक्त ती अजूनही बंदच राहील एवढेच सांगितले" दिवाणजी म्हणाले.

"म्हणजे उत्पन्न नाहीच व त्यात या नविन मॅनेजरची भर." सविता उपरोधीकपणे म्हणाली.

"हे सर्व मार्गी लागेपर्यंत मला कसलेही वेतन नको" मी म्हणालो, "पण, हा बशीर कोण आणि फॅक्टरी बंद करणारा तो कोण?"

“ते सर्व मी तुला उद्या फॅक्टरीत आल्यावर सांगेन” इती दिवाणजी.

“उद्या नाही. मी आताच तुमच्या बरोबर येणार आहे." निळ्या डोळयात समाधान दिसत होते. पोर्च मध्ये येईस्तो हलक्या आवाजात दिवाणजींनी बशीरबद्दल माहिती दिली. बशीर हा स्थानिक नगरसेवकाचा पित्त्या होता. किरकोळ मवालीगीरी करणारा हा माणूस नगरसेवकाच्या पाठिंब्याने व्यावसायिकांना धमकावणे, त्यांच्याकडून हप्ते गोळा करणे असे प्रकार करू लागला. वेलजी व्यवसाय करत असतांना त्याची कधी त्यांना धमकावण्याची हिम्मत झाली नव्हती. पण ते विकलांग झाल्यावर तसेच समर्थपणे बघणारा कोणी नसल्याने तो दरमहा दहा हजाराचा हप्ता मागत होता. तो न दिल्याने कामगारांना धमकावून कामावर जाण्यास मज्जाव करीत होता.

“तुम्ही पोलिसांकडे का नाही गेलात?”

‘पोलिस’ असे म्हणत दिवाणजी इतके उपरोधीक हसले की मला सर्व समजले. तरी मी विचारलेच की ते काय म्हणतात?

“ते तक्रार पण नोंदवून घेत नाहीत. आम्हाला काय एवढेच काम आहे काय? असे विचारतात.” एव्हाना आम्ही पोर्चमध्ये आलो होतो.

मी दिवाणजींना सहज विचारले, “आपण जायचे कसे?”तर ते विचारात पडले. “मी तर बसने आलो पण तुला बस चालेल काय?” असे विचारू लागले.

तेवढयात कविता व्हेस्पाच्या किल्ल्यात घेऊन आली व मला देत म्हणाली “सध्या ही गाडी घेऊन जा एक दोन दिवसात मी मेकॅनिककडून ॲम्बेसेडर पण चेक करून घेईन. नंतर ती वापर.” ती घेत असलेला पुढाकार बघून मला बरे वाटले.

आम्ही निघणार तेवढ्यात आम्हाला थांबवून तिने कोपऱ्या-तील वॉकिंग स्टीक काढून दिवाणजीकडे दिली व चालतेवेळी ही विनय वापरेल याकडे लक्ष द्या असे सांगितले. पंधरा मिनिटांत आम्ही मार्बलगंजला पोहोचलो. वातावरणात सर्वत्र बारीक धुळीचे कण होते. तसेच स्टोन कटिंगचा आवाज सर्वत्र येत होता.

“बाकीची सर्व मंडळी त्यांच्या कंपन्या कशा काय चालवत आहेत” मी पृच्छा केली.

“बशीरला हप्ते देवून” दिवाणजी उत्तरले.

वेलजी मार्बलस् असा मोठा बोर्ड दिसताच मी गाडी आत वळवली. एक भव्य शेड, इतस्तत: पडलेले कडप्पा व मार्बल चे वेगवेगळया आकाराचे तुकडे, चार मोठाली कटिंग मशिन्स, चार मोठे पाण्याचे हौद या गोष्टी प्रथम नजरेस पडल्या. डाव्या बाजूला

एक लहानसे ऑफिस व उजव्या बाजूला दहा लहान औटहाऊस सारखी घरे दिसत होती. मी प्रश्नार्थक मुद्रेने बघताच दिवाणजींनी एक-एक करून मला सर्वांबद्दल माहिती देण्यास सुरुवात केली...

"हा कटिंग एरिया. हे पाणी कटिंग करतेवेळी मार्बल गरम होऊन त्याला क्रॅक जाऊ नये म्हणनू वापरतात. तसेच कटिंग झाल्यावर मार्बल स्वच्छ करण्यासाठी पण वापरतात. हा डिस्पॅच एरिया. ही घरे आपल्याच कामगारांची आहेत. सध्या बिचारे जिकडे काम मिळेल तिकडे करतात. हे आपले ऑफिस. सर्व पत्रव्यवहार ऑर्डर्स इथेच आहेत. चल मी तुला ऑफिस दाखवतो "असे म्हणत आम्ही ऑफिसच्य दिशेने चालू लागलो. तोच मागून आवाज आला "ओ, दिवाणजी, लौंडेको हमारे बारेमे भी समझा दैयो"

मी दिवाणजींकडे बघितले.

"हाच तो बशीर. "

मी कुतुहलाने मागे वळून बघितले. एक टपोरी दिसणारा पंचेचाळीशीचा मवाली, जाळीदार बनियन हिरव्या-लाल रंगाची चौकडीची लुंगी, डोळे तारवटलेले, केसांना चपचपित तेल लावलेले, बरोबर दोन चेले अशा थाटात आमच्याकडे येत होता. एके काळी तो तालिम करित असावा पण तालिम सुटल्याने

आडवा-तिडवा सुटला होता. “हा, ठिक कहयो. पहले अपना हप्ता फिर काम चालू. ठीक समझाईयो. ”

“ मिळणार नाही” मी शांतपणे उत्तरलो. अशा उत्तराची त्याला अपेक्षा नसावी. तो चिडून ओरडला

“ए छोरे, तू जाणता नहि मेरेकु, बशीर म्हणतात मला. ”

“ म्हणत असतील, असे तुझ्यासारखे टपोरी दिल्लीत हमाली करतात. तू पण कर आणि दहा हजार कमव. ”त्याचा चढलेला आवाज ऐकून तीन-चार कामगार बाहेर आले होते. तसेच गेटपाशी पण दहा-बारा बघे गोळा झाले होते. सकाळी सकाळी फुकटात तमाशा बघायला मिळाला तर कोणाला नको असतो?

एव्हाना आमच्यातले अंतर दहा-बारा फुटा पर्यंत कमी झाले होते.

इतक्या लोकांसमोर आपला पाणउतारा झालेला बघून बशीर संतापाने बेफाम झाला व आवेशाने माझ्या अंगावर धावून आला.

“अरे तेरी तो……”

दुर्दैवाने तो वाक्य पूर्ण करू शकला नाही कारण मी अर्ध्या अंतरावरच त्याला गाठले व फक्त निम्मी ताकत वापरून जबडयावर

एक जोरदार ठोसा दिला होता. परिणामस्वरूप बशीर महाशय सरळ गेटपाशी जाऊन धुळीत पडले, तेही प्रेक्षक वर्गाच्या पायाशी.

"बशीर, मी शिवी देत नाही आणि ऐकून पण घेत नाही."

आपण येथे कसे येऊन पडलो याचा बशीर धुळभरल्या चेहऱ्यानी विचार करत असावा कारण मी परत माझ्या जागी गेलो होतो. ज्या वेगाने बशीरचा जबडा सुजू लागला होता तो बघता त्याने दोन तीन दात गमावले असावेत असा माझा प्राथमिक अंदाज होता. गेलेली पत थोडीतरी मिळवावी. या उद्देशाने परत बशीर धूळ झटकून चाल करून आला.

"अभी दिखाता हू तुझे ......"

हे पण वाक्य तो अर्धेच म्हणू शकला कारण त्याचा हात ज्यात त्याने चाकू पकडला होता, मी हवेतच धरून कट् असा आवाज येईतो पिरगाळला होता व त्याला परत गेटच्या दिशेने ढकलले होते.

परत बशीर प्रेक्षकवर्गाच्या पायाशी जाऊन पडला. आता परत उठण्याचे त्याच्यात त्राण नव्हते.

एलबो डिसलोकेटेड म्हणजे कमीत कमी दोन महिने प्लॅस्टर, मी मनाशीच विचार केला.

कमांडोच्या उपजत कौशल्याने मी माझ्या उजव्या बाजूला होणारी हालचाल टिपली.

आपल्या गुरूची ही अवस्था बघून व आपणही काहीतरी केले पाहीजे, या भावनेनी एक चेला त्वेषाने चाल करून येत होता.

आता मात्र बास झाले या विचाराने मी त्याच्या नडगीवर जोराने लाथ मारली. कळवळत तो पण बशीर पाशी जाऊन पडला.

दुसऱ्या चेल्याकडे मी बघताच तो स्वत:हूनच म्हणाला 'साहेब, मी फक्त यांच्याबरोबर आलो होतो. माझा यांच्याशी काहीच संबंध नाही.' गर्दी बघून थांबलेला एक टेम्पो माझ्या नजरेने हेरला होता. मी त्याला सहज सांगावे तसे या दोघांना टेंम्पोत घालून हॉस्पीटलला नेण्यास सांगितले. गर्दीतल्या लोकांची मदत घेऊन ते त्याने त्वरेने केले. आता काही नविन होणार नाही असे बघून गर्दी पांगली.

हा सर्व तमाशा भयाने बघणाऱ्या दिवाणजी जवळ जाऊन मी वॉकिंग स्टिक त्यांच्या हातातून माझ्याकडे घेतली व मिस्कीलपणे म्हणालो, 'ही कविताने माझ्यासाठी दिली आहे, दिवाणजी!'

भानावर येऊन दिवाणजी म्हणाले, “ हो, हो माझ्या लक्षात आहे. ”

त्यानंतर मी त्यांना जेवढे कामगार असतील त्यांना बोलावून काम सुरू करण्यारस सांगितले. एव्हाना ते सर्व आलेच होते पण त्यांच्या सुरावरुन परत बशीर आलाच तर आम्हाला त्रास देईल अशी भीती जाणवली. दिवाणजींना पण तसेच वाटत असावे. ते फक्त उघडपणे बोलले नाही ऐवढेच.

' असेच जर तुम्हाला वाटत असेल तर, मी येथेच मुक्काम करतो. ' हे ऐकल्यावर ते आश्वस्त झाले पण शेडमधे कामाला काही गेले नाही. असे का? विचारताच त्यांच्यातला एकजण हळूच म्हणाला की, आमचे चार महिन्याचे पगार अजून झाले नाहीत. त्याबद्दलपण काहीतरी करा. कसल्या अंतःप्रेरणेने म्हणा किंवा अती उत्साहाने म्हणा, मी सहज बोलून गेलो की, 'मला एक महिन्याची मुदत द्या. तेवढया अवधीत तुमचे पैसे तुम्हाला मिळतील. ' एवढ्यावर त्यांचे समाधान झाले असावे कारण लगेच काम सुरू झाले.

मी दिवाणजीबरोबर ऑफिसमधे पोचताच त्यांना यांची नेमकी थकबाकी किती आहे हे विचारले. त्यांनी अंदाजे एक लाखतरी आहे. नक्की आकडा दोन तासात सांगतो असे उत्तर दिले आणि हळूच विचारले, “ विनय, एका महिन्यात पैसे कसे उभे करणार?”

“ बघू, मी बोलतो वेलजीभाई आणि कविताशी. ”

“काही उपयोग होणार नाही. आज जरी काम झाले तरी ऑर्डर पूर्ण होऊन हाती पैसे येण्यास महिना तरी लागेल. ”

“कोणत्या ऑर्डर्स लवकर करता येण्यासारख्या आहेत?”

“ यश कंपनीची तीन लाखाची ऑर्डर अर्धी शिल्लक आहे. पण ती पूर्ण करण्यास सलग तीन आठवडे लागतील. ”मला ऑर्डरची प्रत देत ते म्हणाले.

मला त्या प्रतीतले काहीही कळत नव्हते. तरी मी ती सहज उचलली. Terms & Condition मध्ये अर्धी रक्कम ॲडव्हान्स देण्यात येईल असे लिहिले होते. बाकी रक्कम ऑर्डर पूर्ण झाल्यावर ऑर्डर वेळेवर पूर्ण न झाल्यास दहा परसेंट पेनाल्टी लागू होईल असे लिहिले होते. त्याबद्दल विचारताच ते म्हणाले मोठी कंपनी आहे पण ॲडव्हान्स कधीच देत नाही उलट आता ऑर्डर वेळेवर न झाल्यास पेनल्टी लावतील.

“चला, आपण भेटून येऊ” मी म्हणालो.

“ विनय, हा मारधाड करून सुटणारा प्रश्न नाही. ” दिवाणजी फारच शांतीप्रिय व्यक्ती होते.

“नाही, आपण फक्त ॲडव्हान्स मागून बघू, दिला तर दिला. ”

दिवाणजी जरा विचारात पडले. “प्रयत्न करून बघायला हरकत नाही. पण खरेतर कोणतीही येणारी रक्कम आपण बँकेचे कर्ज फेडण्यासाठी वापरली पाहिजे. ”

“बँकेचे किती देणे आहे?”

“तीन लाख. अर्धे कर्ज व्यवस्थित फेडले आहे. ”

“ठीक आहे. बँकेत पण जाऊ. फाईल तयार ठेवा. ”

“विनय, एकाच दिवशी सर्व प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू नकोस. आधी हे बशीरचे प्रकरण आज आपला किती वेळ घेईल हे सांगता येत नाही. ”

“का? आता काय होणार आहे?”

“विनय, ही दिल्ली नाही. या गल्लीतल्या पोलिसांना आपण काहीतरी करतो आहे हे दाखवायला फार आवडते.”

येताना मी बात्रांना शब्द दिला होता. पोलिसांच्या भानगडीत पडणार नाही. पण आता भानगड माझ्यापाशी आली होती.

“पण तुमची तर तक्रारपण नोंदवून घ्यायला ते तयार नव्हते?”

“कारण माझ्याकडून त्यांना काहीही मिळणार नव्हते.”

एव्हाना बोलाफुलाला गाठ पडल्यासारखी पोलिसांची जीप गेटपाशी येऊन थांबली. दिवाणजी सवयीप्रमाणे जीपपाशी जाण्यासाठी निघाले होते पण मी त्यांना नजरेनेच खुणावून जागीच थांबवले. आपल्याला भेटायला कोणीच येत नाही बघून एक इंस्पेक्टर उतरले व ऑफिसमधे आले. गणवेषाचा फरक सोडल्यास मला ते बशीरचीच कॉपी वाटले. दरवाज्यावर काठीने टकटक करून ते मोठयाने गरजले, “ येथे विनय कोण आहे?”

“मी” मी उभे राहून उत्तर दिले.

"”तू?” किंचित अविश्वासाने ते म्हणाले कारण मी आधाराला काठी धरली होती.

“चल चौकीवर, तुझ्या विरुध्द तक्रार आहे. ”

“कोणाची?”

“ बशीरची, चल फालतू चौकशा करू नको. ”

“ पण बशीर तर हॉस्पीटलला गेला आहे. तुमच्याकडे केव्हा आला? मीच त्याला हॉस्पीटलला पाठविले आणि त्याची तर काही तक्रार नव्हती.” इन्स्पेक्टर चमकले पण तरी रेटून म्हणाले, 'त्याच्याशी तुला काय करायचे, चल म्हटले की चलायचे. '

“दरोगाजी, आपण असे करू की बशीरला हॉस्पीटलमध्येच जाऊन भेटू. जर त्याची तक्रार असली, तर विनय तुमच्या बरोबर चौकीत येईल.” वाद वाढत आहे असे बघून दिवाणजी म्हणाले.

“माझी हरकत नाही “ मी म्हणालो, “पण त्याची तक्रार असल्यास तो येथे दहा हजार रूपयाचा हप्ता मागण्यास आला होता ही माझी तक्रार राहील. ”

“आणि नसल्यास?” इन्स्पेक्टर म्हणाले.

“ माझीही तक्रार नसेल. ”

थोडा विचार करून इन्स्पेक्टर म्हणाले “ठीक आहे. चला हॉस्पिटलला जाऊ या. ' कामगारांना उगीच आम्हाला पोलीस घेऊन गेले असे वाटायला नको म्हणून निघतांना मोठ्यानी ओरडून सर्वांना आम्ही अर्ध्या तासात परत येत आहोत असे दिवाणजींनी सांगितले.

हॉस्पिटल मधे बशीरवर उपचार सुरू झाले होते. बहुतेक दाढेवर इंजेक्शन दिले असावे कारण त्याला बोलायला फारच त्रास होत होता. आता चेहरा संपूर्ण सुजला होता. डोळयाच्या जागी फक्त फटी दिसत होत्या.

डॉक्टरांकडे पूर्ण दुर्लक्ष करत इन्स्पेक्टरनी बशीरला विचारले, ''बशीर, बोल तुझे किसने मारा?''

बशीरने कष्टाने त्यांच्याकडे व नंतर माझ्याकडे बघितले व कसाबसा म्हणाला, ''किधर साब, मेरा मैही गीरा.'' इन्स्पेक्टरचा चेहरा पडला तरीही परत म्हणाले, ''अरे, विनयची काही तक्रार नाही तूच काय झाले ते सांग. ''

''साहेब, तेच सांगतोय, मीच पडलो. ''असे म्हणनू बशीरने डोळे (म्हणजे आता फट) मिटून घेतले.

निराशेनी इन्स्पेक्टरनीं मान हलवली व मला म्हणाले, ''या वेळी वाचला, दर वेळी वाचशिलच असे नाही. ''

''इन्स्पेक्टर, जी तत्परता एका मवाल्याकरता दाखवता तीच जरा सामान्य लोकांकरिता पण दाखवीत जा'' मी रागात बोललो.

इन्स्पेक्टर संतापाने लाल झाले पण डॉक्टर, दिवाणजी बाजुला असल्याने काही बोलले नाहीत. त्यांनी हातानी आम्हाला जाण्याची खूण केली. पडत्या फळाची आज्ञा घेऊन दिवाणजींनी मला जवळपास बकोटीलात धरूनच बाहेर काढले.

''विनय, प्रत्येक ठिकाणी वाद घातलाच पाहिजे काय? जरा रागावर ताबा ठेव.'' मी चमकलो हे तर बात्रांचेच वाक्य होते. मी

सहज आढावा घेतला तर बात्रांनी ज्या गोष्टी कटाक्षाने टाळायला सांगितल्या होत्या, त्याच मी नेमक्या करत होतो.

“ठीक आहे दिवाणजी मी प्रयत्न करेन, ” मी उत्तरलो “ मला प्रचंड भूक लागली आहे. ”

“लागणारच, एवढी हाथापाई बघून मला पण लागली आहे. ”

## अर्थकारण

जेवण झाल्यावर आम्ही कारखान्याला परत गेलो. तेथे काम व्यवस्थित सुरू होते. आम्हाला परत आल्याचे बघून कामगारांना जरासे आश्चर्य व हायसे वाटल्याचे जाणवले. वातावरणात प्रचंड धूळ जाणवत होती पण कामगार तसेच तोंडाला फडकी बांधून काम करीत होते.

"”याचा त्यांना त्रास होत नाही?”मी विचारले.

“होतो, डोळयांचे विकार, अस्थमा, टी. बी येथील कायम रोग आहेत” मी काहीच बोललो नाही. थोडया वेळाने त्यांना म्हणालो, “चला बँकेत जाऊ या. ”

“हो चल, पण डोकं शांत ठेव. ”

“तुम्ही आधी चला तर, तुमचा विश्वास बसणार नाही इतका मी शांत राहीन. ”

बघुया, असे म्हणत त्यांनी आवश्यक ते कागदपत्रे घेतली व आम्ही निघालो. रस्त्यात त्यांनी आवश्यक ती माहिती दिली. बँकेत पण त्यांची बरीच ओळख होती.

“आपण सरळ मॅनेजर साहेबांनाच भेटू” एका केबिनकडे हात दाखवत ते म्हणाले. केबिन वर पाटी होती ‘राम साठे' प्रमुख प्रबंधक. मनात म्हणालो ‘निम्मे काम झाले’ पण वरकरणी काहीच न दर्शविता गप्प बसलो.

पाच मिनिटात आम्हाला आत बोलावले गेले. आतमधे प्रबंधकाच्या खुर्चीत एक तिशीच्या दरम्यानचा गोरापान घाऱ्या डोळ्यांचा उमदा तरूण बसला होता. आज सकाळ पासून मला सर्व प्रौढच भेटले होते. हा पहिलाच तरूण. “आओ, आओ काकाजी, आणि हे कोण बरोबर?” असे म्हणत त्याने आमचे स्वागत केले.

“ विनय, आमचे नविन मॅनेजर आणि काम आमचे नेहमीचे मुदतवाढीचे. ”

“ काकाजी, मी माझ्या अधिकारात जास्तीत जास्त मुदतवाढ आधीच दिली आहे. अजून देणे खरंच शक्य नाही,” राम म्हणाला.

“सर, आमच्या हातात एक मोठी ऑर्डर आहे. ती या दोन महिन्यात पूर्ण झाली तर आम्ही सर्व कर्ज एक रकमी फेडू शकतो' मी म्हणालो आणि आजपासून काम जोरात सुरू पण झाले आहे.”

“ काम सुरू झाले हे मलापण कळले आहे ' राम म्हणाला “पण ऑर्डर पूर्ण होईल की नाही याची मला खात्री वाटत नाही. ” लहान गावात बातम्या फार लवकर पसरतात असे मला वाटले.

“सर, आमच्यावर विश्वास ठेवा व एक संधी आम्हाला द्या “ मी शुद्ध मराठीत म्हणालो. शुद्ध मराठी ऐकताच राम दचकलाच.

“ तुम्हीतर फारच छान मराठी बोलता. ”

“ माझे शिक्षण कोल्हापूरला झाले आहे” मी म्हणालो.

“तरीच, सांगा तुमच्या योजना. ”

“सर, ऑर्डर पूर्ण झाल्याबरोबर येणाऱ्या पैशातून आम्ही राहिलेले कर्ज फेडू पण आम्हाला पाच लाखाचे नवीन कर्ज तातडीने मिळावे. ”

नकळत रामच्या ओठातून शिटीचा आवाज आला. दिवाणजीकडे बघितले तर ते रूमालानी घाम टिपत होते म्हणजे त्यांना मतितार्थ तर नक्कीच कळला होता.

“विनय, त्या करता मला वेलजीभाई आणि कविताची संमती लागेल. ”

“जरूर, तुम्ही त्यांना केव्हा भेटू शकता?”

“त्यांना इथे यायची गरज नाही. मीच उद्या दुपारी दोन वाजता त्यांना भेटण्याकरता येईन. वेलजीभाईनी मला सुरूवातीच्या काळात म्हणजे मी येथे नविन होतो, तेव्हा मला फार मदत केली आहे. ”

वेलजींचे नाव हे माझ्याकरता हुकुमाचा एक्का ठरत होते.

“जरूर, मी त्यांना तशी कल्पना देतो. ”

“ठीक आहे, अरे एकदा घरी जरूर ये. माझी पत्नी पुण्याचीच आहे. तिला पण आनंद होईल तुला भेटून. काकाजी तुम्ही पण या यांना घेऊन. ”

जरूर येवू असे म्हणत आम्ही त्याचा निरोप घेतला. बाहेर आल्याबरोबर मी दिवाणजींना सहज विचारले, ”काय? राहिलो की नाही शांत?”

“याच्यापेक्षा मारपीट परवडली, ” ते घाम टिपत उत्तरले.

“चला आता यश कंपनीत” मी व्हेस्पाला किक मारत म्हणालो, “आणि तिथे कसे वागावे याबद्दल काही सूचना?”

“काही नाही, तुला काही सांगण्यात अर्थ नाही, ” ते पुटपुटले

“म्हणजे?”

“तुला योग्य वाटेल ते कर. ”

यश कंपनी

यशचे हेड ऑफिस शहराच्या मध्यवर्ती भागात होते. एका पॉश सहा मजली इमारतीत यशची सर्व महत्वाची कार्यालये होती. बांधकाम व त्यासाठी लागणाऱ्या सर्व सामुग्रीची विक्री हा त्यांचा मुख्य व्यवसाय होता. तसे पाहिले तर सज्जनपुरचा प्रमुख व्यवसाय बांधकाम व त्यासाठी लागणाऱ्या सामुग्रिची विक्री हाच दिसत होता. तिसऱ्या मजल्यावरील एका ऑफिस मधे आम्ही जाताच तेथील प्रमुखांशी आमची भेट झाली. दिवाणजी येथेपण चांगलेच परिचित होते. पण ऑर्डर संदर्भात बोलणे सुरू होताच त्यांनी पेनल्टीची भाषा सुरू केली. तेव्हा दिवाणजींनी अपेक्षेने माझ्याकडे बघितले. “विनय तू तरी मेहताजींना समजावून सांग.”

“काकाजी, त्याचा काही उपयोग नाही, मलापण वाईट वाटते पण कंपनी पॉलिसी मी बदलू शकत नाही. ”

“मग कोण बदलू शकते?”मी शांतपणे विचारले.

“मॅनेजिंग डायरेक्टर सेठणा” तेही तेवढयाच शांतपणे म्हणाले.

“सेठणा साहेबांना आम्ही भेटू शकतो?”

“जरूर, त्यांची अपॉइंटमेंट घ्यावी लागते. ”

त्यांनी हातानीच त्यांची केबिन दाखविली. मी दिवाणजी-बरोबर केबिन कडे गेलो. केबिनच्या बाहेर सेठणा साहेबांची पी ए नेलपॉलिशने नखे रंगवीत बसली होती. तिच्या समोर तब्बल पाच मिनिटे उभे राहिलो तरी तिला आम्हा क्षुद्र प्राण्यांची दखल घ्यावीशी वाटली नाही. म्हणून मी तिच्या टेबलावर टक टक असा आवाज केला. त्रासिक मुद्रेने तिने ‘क्या है?' असे विचारले.

“ आम्हाला सेठणा साहेबांना भेटायचे आहे. अर्जन्ट काम आहे?"

“अपॉइंटमेंट आहे?”

“नाही. पण काम अर्जन्ट आहे. ”

“साहेब बिझी आहेत. ”

“आम्ही पाहिजे तर थांबतो, पण भेटणे जरूरी आहे. ”

“पुढच्या सोमवारी या, आता भेटणे अशक्य आहे. ”

ही सर्व प्रश्नोत्तरे होत असतांना एकदाही तिने मान वर करून बघायची तसदी घेतली नाही. तसेच नखे पॉलीश करायचे पण थांबवले नाही. मी सरळ केबिनचे दार ढकलून व आत बसलेल्या व्यक्तीला आत “येऊ काय?” असे विचारले.

“काय काम आहे?”

“सर, मला तुमची फक्त पाच मिनिटे हवी आहेत. ”

त्यांनी समोरच्या खुर्ची कडे हात केला. मी आणि दिवाणजी लगेच स्थानापन्न झालो. तेवढ्यात पी ए दार ढकलून घाईने आत आली व त्यांना सांगू लागली की मी यांना मना करत होते पण हे न ऐकताच आत घुसले.

“सर, काम महत्वाचे असल्याने आमच्या समोर पर्याय नव्हता” मी म्हणालो.

सेठणा साहेब साधारण साठीच्या आसपास असावेत. त्यांचे व्यक्तिमत्व फारच प्रभावी होते. काही माणसांना वार्ध्यक्य पण फार खुलुन दिसते. त्यातलेच सेठणा साहेब होते.

“मला त्याची कल्पना आहे. तू जाऊ शकतेस. तुम्ही बोला” ते मला उद्देशून म्हणाले.

मी थोडक्यात सर्व सांगितले व आम्हाला झालेल्या कामाचे तरी पैसे मिळावे म्हणून विनंती केली. खुर्चीत किंचित मागे रेलून त्यांनी हळुवार आवाजात विचारले, “यात आमच्या कंपनीचा काय फायदा?”

बनिया, पक्का बनिया माझ्या मनात विचार चमकून गेला. उघडपणे मी फक्त एवढेच म्हणालो की, ” एक प्रकारे आम्ही

तुमच्या परिवारातील सदस्य आहोत आणि यश कंपनी परिवाराची काळजी घेते असा लौकिक आहे. ''

''हे माझ्या प्रश्नाचे उत्तर नाही. ''

'''सर, एका व्यवसाय बंधुला अडचणीत असतांना मदत करणे हे समाधान पण काही कमी नाही.''

ते हसले व म्हणाले, ''हे बरोबर आहे. वेलजीभाईना मदत करण्याची संधी घालवण्या इतपत मी मूर्ख नाही. ''

त्यांनी ताबडतोब मेहतांना बोलावले व आतापर्यंत केलेल्या कामाचा हिशेब करून तो चेक तयार करण्यास सांगितले. मेहतांची आकडेवारी तयार होती. त्यांनी दोन लाखाचा चेक दहा मिनिटात सहीसाठी समोर ठेवला. त्यावर त्यांनी सही केली व माझ्या हातात चेक देत म्हणाले, ''हा आजच्या तारखेचा चेक आहे. पण तीस ऑगस्ट पर्यंत तुम्ही हा जमा करू नका.''

''का?'' परत हा बनिया काय अट घालेल याचा विचार करत मी विचारले.

''३० ऑगस्ट पर्यंत जर तुमची पहिली कंसाईनमेंट आली तरच हा जमा करा ही माझी अट आहे. ''

एक प्रकारे सप्लाय गॅरंटी पण तोंडी, मी मनात म्हणालो. “सर, आम्ही हा उद्या पण जमा करू शकतो. ”

परत स्मितहास्य करत ते म्हणाले, ' तसे तुम्ही करणार नाही. '

“आणि केले तर?”

“मला इतकी वर्षे व्यवसाय करून पण माणसे ओळखता येत नाही असे मी समजेन.” या भरत वाक्यानंतर मुलाखतीचा समारोप झाला हे सांगायला नकोच.

# घरचा अहेर

आम्ही चेक घेऊन बाहेर येईपर्यंत संध्याकाळचे सहा वाजले होते. मागे बसतांना दिवाणजी हळूच म्हणाले, “आता गाडी सरळ हवेलीकडेच घे आणि मध्ये एखादे मेडिकलचे दुकान दिसल्यास थांब. मला B. P. च्या गोळया घ्यायच्या आहेत. ”

“एका दिवसात ऐवढया घडामोंडीना तोंड दिल्यावर B. P. शूट होणारच “ मी म्हणालो “आणि वेलजीभाईना जेवढे झाले तेवढेच सांगा. उगीच तिखटमीठ लावून सांगू नका नाहीतर त्यांचेपण B. P. शूट होईल. तसेच गेल्याबरोबर वॉकींग स्टीक माझ्याकडे द्या. ”

“का, कविताला एवढा घाबरतोस काय. ”

मी ऐकू न आल्यासारखे केले. हवेलीला पोचतात वॉकींग स्टिक माझ्या हातात कोंबून दिवाणजी झटपट वेलजी भाईच्या खोलीकडे गेले. लगबगीने जाणाऱ्या त्यांच्या किंचित स्थूल आकृतीकडे बघतांना मला मनोमन त्यांचे कौतुक वाटले. खरेच त्यांच्या स्वामीभक्तीला पर्याय नव्हता. एवढी दिवसभर पळापळ करून पण हा माणूस मालकांच्या कानी पूर्ण वृत्तान्त घातल्या

शिवाय घरी जात नव्हता. अहो विनय वरून ते केव्हा अरे विनय पर्यंत पोहचले आणि किती सहजपणे ते मला कळले पण नाही. मला हा ईमानदार माणूस फारच आवडायला लागला होता.

“सांभाळून, तू फारच गुंतला जात आहेस.’ असे मनाला बजावीत मी फ्रेश होण्याकररता खोलीत गेलो. साधारण एका तासानी फ्रेश होऊन सरळ जेवणाकरताच जाऊ असा विचार करून मी प्रथम स्नानाकरता गेलो. साडेसातच्या दरम्यान फ्रेश होऊन आणि आठवणीने वॉकिंग स्टिक हातात घेऊन डायनिंग टेबलकडे जेव्हा मी गेलो तेव्हा तेथे स्वागत समिती म्हणजे वेलजीभाई, कविता, सविता व हनुमानजी म्हणजे दिवाणजी ( होय, योगायोगाने त्यांचे नाव पण हनुमान प्रसाद होते) आधीच स्वागतासाठी तयार होऊन बसली होती.

“या विनय महाराज, उगाच ती वॉकींग स्टीक घेऊन फिरण्याचे ढोंग करू नका. ” पहिला हल्ला कविता.

मला बघताच दिवाणजींची टकळी बंद झालेली दिसली.

“तरी मी त्याला दिवसभर आठवण करून देत होतो. ” ईती दिवाणजी उर्फ दलबदलू.

काही उत्तर न देता मी सूप पिण्यास सुरुवात केली.

“बघा काहीतरी वाटतेय काय? काय गरज होती बशीरशी मारामारी करायची? काही झाले असते तर तुमच्या आईला आम्ही काय उत्तर दिले असते?” परत कविता.

हा आईचा उल्लेख मला खरंच कळला नाही कारण मला विनय नावाची अजून सवय झाली नव्हती आणि मी माझ्या आईला कधी पाहिलेच नव्हते. माझ्या चेहऱ्यावरचा संभ्रम बघून ती परत म्हणाली, “अरे देवा, आता याला परत विसर पडला की हा पण अभिनय आहे?”

या प्रश्नाला उत्तर न देता मी पुलाव खायला सुरुवात केली.

“मी तुला काही विचारत आहे, विनय” कविता कडक आवाजात म्हणाली.

“मी ऐकतोय, पण मला आता भूक लागली आहे आणि जेवल्यावर परत फॅक्टरीत जायचे आहे. ”

“कशाला? परत मारामारीचा कार्यक्रम आहे?”

माझ्या सेनेतल्या कारवाया हिला कळल्या तर हे स्वयंपाकघर, हे टेबल ही फिनाईलने दहा वेळेस धुवून घेईल. या विचाराने मला हसायला आले.

“हसायला काय झाले? तू केवढी जोखीम घेतली होती याची तुला कल्पना आहे?”

“का? अवीनी नसते एवढे केले?” या माझ्या प्रश्नाने कविताने आवेशाने वर केलेला हात हळुच खाली आणला व तिच्या डोळयात पाणी तरारले. बाकीचे पण सर्व स्तब्ध झाले.

परत बोलायला सुरुवात केली ती सविताने, ”ते सर्व ठीक आहे पण चेक 30 ऑगस्ट पर्यंत जमा न करण्याचे हे काय प्रकरण आहे? ते काही नाही उद्या साठे साहेब येणारच आहे. त्यांच्याकडेच चेक दे. ”

“नाही, मी तसा शब्द सेठणा साहेबांना दिला आहे. ”

“मी मालक या नात्याने सांगत आहे. ”सविता.

“याच नात्यांनी उद्या ये कामगाराशी बोलायला आणि कंसाईनमेंट 30 तारखेच्या आत पूर्ण कर. अजून एक गोष्ट लक्षात ठेव, मी तुझा पगारी नोकर नाही. ” मी झटक्यात बोललो.

निळ्या डोळयात विषाद उमटला.

“ताई, विनयचे बरोबर आहे. बिझिनेस मधे शब्द महत्वाचा असतो. त्यानी आपल्या वतीने शब्द दिला आहे. तो आपण

पाळला पाहिजे" कविता शांतपणे म्हणाली "मग, तू उद्या येतेस का फॅक्टरीत?"

"नाही, मला वेळ नाही. जरुरी काम आहेत शिवाय ज्यानी शब्द दिला आहे त्यानीच तो पाळावा. "सविता फणकारली.

निळे डोळे एकदा माझ्याकडे रोखले नंतर कवितावर स्थिरावले,

"कविता, तू उद्या दहा वाजता येऊन कामगारांशी बोलावे असे मला वाटते. " मी म्हणालो , "मी पण असेनच पण मालकापैकीं कोणी बोलणे योग्य राहील बाकी सर्व दिवाणजी समजावून सांगतील."

"ठीक आहे. मी येईन. " कविता निश्चयाने म्हणाली.

निळे डोळे समाधानाने लुकलुकले.

# परिश्रम

फॅक्टरीत जाण्यासाठी मी व्हेस्पा स्टँड वरून काढत असतांनाच ' विनय एक मिनिट ' असे म्हणत कविता आली.

“आता काय?”

“काही नाही, सविता जे काही तुला बोलली त्याबद्दल मी तुझी क्षमा मागते. ”

“ म्हणजे. ? ती बोलली आणि क्षमा मागते तू?” मी आश्चर्याने म्हणालो, “कविता, असल्या बोलण्याने मला काहीही फरक पडत नाही. पण तू जरा कणखर बन. उद्या तुला हा व्यवसाय सांभाळायचा आहे. तेव्हा दर वेळेस डोळयात पाणी आणून आणि क्षमा मागून चालणार नाही. ”असे म्हणून आणि तिला विचारात पाडून मी सरळ फॅक्टरीत गेलो. तिथे दिवाणजींनी ऑफिसमधे माझी तात्पुरती रहाण्याची व्यवस्था केली होती. हा माणूस खरेच चौफेर लक्ष ठेवणारा होता. मला बघून कामगारांना जरा नवल वाटले कारण बशीर प्रकरणाचा शेवट त्यांनापण कळला होता. पण सर्व सुरळीत होईपर्यंत मी रात्री येथेच येणार हे ऐकल्यावर त्यांनापण बरे वाटले. काही लागल्यास आम्हाला सांगा असे म्हणून ते आपापल्या घरी

गेले. पावसाची लक्षणे दिसत होती. तशी काही शक्यता दुपारी वाटत नव्हती. ढगाळ वातावरण बघून मला अचानक बात्रांची आठवण आली. आता ते काय करत असतील माझा ठावठिकाणा, मी काय करत आहे, याची त्यांना कल्पना असेल काय असा विचार करतच मी झोपी गेलो.

सकाळी माझे सर्व आठ वाजताच आटपले होते. नवू वाजता दिवाणजी आले. एव्हाना काम सुरू झाले होते. मी त्यांच्या बरोबर फिरून उगाच आपले हे काय ते काय, याला काय म्हणतात असे जुजबी प्रश्न विचारत होतो. ते पण न कंटाळता माहिती देत होते. दहाच्या ठोक्याला गेटमधून व्हाईट ॲम्बेसेडर आत आली व त्यातून कविता उतरली.

तिला बघताच सर्व कामगार उत्स्फूर्तपणे गाडी भोवती गोळा झाले व टाळया वाजवून त्यांनी तिचे स्वागत केले. दिवाणजी लगबगीने तिला घेऊन ऑफिसमधे गेले. अर्थात् मागोमाग मी पण गेलो. आता ते ऑफिस कम स्लीपिंग रूम झाले होते. त्या पसाऱ्या कडे व माझ्याकडे एक नाराजीचा दृष्टीक्षेप टाकून तिने दिवाणजी कडून काय बोलायचे याची माहिती करून घेतली व आम्ही सर्व परत बाहेर आलो. कामगार अजून गाडीपाशीच होते. तिला

कदाचित परत जायचे असेल या विचाराने ते बाजुला होऊ लागताच तिने हातानेच त्यांना थांबण्यास सांगितले.

कविताने सुरुवात केली, “खरे तर मी तुम्हा सर्वांशीच बोलायला आली आहे. ” सुरुवातीला किंचित कापणारा तिचा आवाज आता शांत व स्थिर झाला. “फॅक्टरीची परिस्थिती तुम्हाला पूर्ण माहिती आहेच. पण आपले नवीन मॅनेजर व दिवाणजींनी कालच खूप धडपड करून यश कंपनीची ऑर्डर पूर्ण करण्याचे ठरवले आहे. याने आपले सर्व प्रश्न सुटतील असे नाही पण फॅक्टरी सुरू राहील हे नक्की. मला आत्ताच्या घटकेला तुमची मदत पाहिजे आहे.”

"दीदी, तुम्ही फक्त सांगा.” एक कामगार उत्स्फूर्त पणे म्हणाला.

“ऑर्डर पूर्ण होईपर्यंत पैशाची कमतरता जाणवणार आहे. त्यामुळे सध्या तरी अजून एक महिना तुमचे पगार व थकबाकी देणे शक्य नाही. फारच काय OT पण देऊ शकत नाही म्हणून मला तुम्हाला विचारायला फारच संकोच वाटत आहे की अजून एक महिना तुम्ही विनापगार काम करू शकाल काय? पैसे येताच किंवा आधी काही सोय झाल्यास तुमची सर्व थकबाकी आम्ही देऊ याची मी खात्री पण हा एक महिना मला सांभाळून घ्या. ” माझा स्वत:च्या

कानावर विश्वास बसत नव्हता. कालपर्यंत प्रत्येक वाक्याला डोळयात पाणी आणणारी ही मुलगी एवढे स्पष्ट व सुसंगत बोलत होती.

"अजून एक गोष्ट" कविता बोलतच होती "याची कोणावरही सक्ती नाही. ज्यांना शक्य नसेल काही अडचण असेल ते गेले तरी चालतील. त्यांच्याबद्दल कोणताही आकस ठेवण्यात येणार नाही. तसेच त्यांची देणी पण बुडणार नाहीत. "

"आमची तयारी आहे", एकमुखी आवाज आला व सर्वजण कामाला गेले. दिवाणजी व माझ्याजवळ येत कविता म्हणाली, " तुम्ही दोघेही माझ्या बरोबर चला. दुपारी दोन वाजता साठे साहेब येणार आहेत ना? आणि माझ्याकडे बघत मिस्किल पणे हसून म्हणाली मारामारी न करताही प्रश्न सोडवता येतात. " भानावर येत मी तिला गाडी कोण चालवत होता ते विचारले.

"मेकॅनीक, जो गाडी चेक करायला आला होता त्यालाच मी मला येथे ड्रॉप करण्यास सांगितले" ती सहजपणे म्हणाली, "पण आता जातेवेळी त्याला त्याच्या गॅरेजवर सोडल्यानंतर तुलाच गाडी चालवावी लागेल. तुला चालवता येते ना?"

“कविता, याला चालवता येत असो की नसो, तू याच्याबरोबर कोणत्याच गाडीवर बसू नको. मीच काल कसा वाचलो मला कळत नाही. ” दिवाणजी म्हणाले.

सर्वजण हसतच गाडीत बसले

जेवण झाल्यानंतर थोडा वेळ होता म्हणून मी वेलजीभाईजवळ बसलो. थोड्या वेळाने कवितापण आली.

“काका खुश आहेत. ” कविता म्हणाली.

“कशावरून?”

“मी त्यांच्या डोळयावरून अंदाज करू शकते. ”

“हे फारच मोघम होते. आता साठे साहेब येणार आहेत. पैशाचा प्रश्न आहे म्हणनू आपल्याला निदान हो किंवा नाही अशा प्रकारची उत्तरे काकांकडून मिळवली पाहिजे. ”

“पण ते तर बोलू शकत नाहीत. ”

“डोळयांची उघडझाप तर करू शकतात. समजा, आपण आपले प्रश्न असे विचारले की त्यांची उत्तर फक्त हो किंवा नाही येतील आणि त्याप्रमाणे त्यांनी पापण्या मिटल्या तर?” मी म्हणालो.

"बापरे, समजायला जरा कठीण आहे. पण तूच प्रात्यक्षिक करून बघ ना. मला पण उत्सुकता आहे. "

"ठीक आहे" असे म्हणून मी वेलजीभाईना म्हणालो, "काका, आतापर्यंतचे आमचे बोलणे तुम्हाला समजले असेल तर एक वेळा पापण्या मिटा " नंतर आम्ही दोन मिनिटे वाट बघितली पण डोळयांची काहीच हालचाल झाली नाही.

"सॉरी, विनय तुझा प्रयत्न वाया गेला" कविता निराशेने म्हणाली मी पण निराश झालो.

तेवढयात काकांनी हळुवारपणे पापण्या मिटल्या. आम्ही दोघांनीही हर्षाने एकमेकांना टाळया दिल्या. नंतर कविताने प्रश्न विचारला,

"आतापर्यंत विनयने केलेले प्रयत्न तुम्हाला मान्य आहेत काय?" या वेळी एका मिनिटात प्रतिसाद मिळाला. तरी अजून खात्री करून घेण्यासाठी कविताने नकारात्मक उत्तरे असणारे तीन प्रश्न विचारले. काकांनी दोन वेळा डोळयांची उघडझाप करून विरोध दर्शविला. आता साठे साहेब येईपर्यंत काकांना ताण देऊ नये यावर आम्हा दोघांचेही एकमत झाले व आम्ही काकांना आराम करण्यास सांगितले.

बरोबर दोन वाजता राम आला. आल्याबरोबर त्यानी वेलजीभाईंच्या पायाला हात लावून नमस्कार केला. कविता दिवाणजी व माझ्याकडे एक दृष्टीक्षेप टाकून, “काकांची तब्येत आता बरीच छान वाटते. ” असे म्हणाला. “म्हणजे मी साधारणपणे महिन्यापूर्वी त्यांना बघितले होते. त्यापेक्षा तर नक्कीच” त्याने पुस्ती जोडली.

“खरे आहे” असे म्हणत कविताने त्यांना झालेल्या सर्व घटना सांगितल्या. कवितामधे झालेला बदल बघून त्याला आश्चर्य जरूर वाटले असावे पण त्याने तसे दाखवले नाही.

लोन रि-स्ट्रक्चरिंग बाबत यांचा कन्सेंट कसा घ्यायचा? या त्याच्या प्रश्ना वर कविताने ते डोळयांची उघडझाप करून होय किंवा नाही असे सांगू शकतात. फक्त प्रश्न असेच विचारावे लागतात की ज्यांची उत्तरे फक्त होय किंवा नाही येतील हे विशद केले.

मी सोडल्यास बाकींच्याकरता ही बातमीच होती. रामला पण नवल वाटले. त्यांनी चाचणी दाखल दोन तीन प्रश्न आमच्या देखत विचारले आणि त्याची उत्तरे होय, नाही हे वेलजीभाई देऊ शकतात याची खात्री करून घेतली.

“असे होऊ शकते हे मला कोण आधी सांगितले असते तर माझा विश्वास बसला नसता पण आता मानावेच लागेल. ”असे

म्हणत त्यानी मला यांना एकांतात काही प्रश्न विचारायचे आहेत असे सांगून कविता सोडून बाकी सर्वांना बाहेर खोलीत थांबण्यास सांगितले.

“विनय, ही जादू केव्हा झाली?” बाहेर येताच दिवाणजींनी विचारले.

“त्यात कसली जादू आहे काका? होय किंवा नाही हे स्पष्ट कळले पाहिजे म्हणून कविताला सहज ही गोष्ट सुचली.”

“हे फारच छान झाले. ” तो स्वामिनिष्ठ म्हणाला.

“म्हणून त्यांना सारखे प्रश्न विचारून त्रास द्यायचा नाही. ”

“छे छे एवढे काय मला कळत नाही?”

एवढे बोलणे होत असतांनाच कविताने आम्हा सर्वांना परत बोलावले.

“मी नवीन कर्जाबाबत सर्व माहिती वेलजीभाईना व कविताला दिली आहे आणि त्यांची संमती आहे याची खात्री करून घेतली आहे. ”

“पैसे केव्हा मिळतील?” आता सविताला कंठ फुटला.

“या महिना अखेरीस”

“कविता, सेठणा साहेबांच्या चेक बद्दल रामला सांगितले आहे ना?” मी.

“कविताने मला सर्व सांगितले आहे” सर्व शब्दावर जोर देत राम म्हणाला “आणि तिच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. ”

“कामगारांच्या थकबाकीबद्दल काही ठरले काय?”- दिवाणजी.

“काका तुम्ही त्याची जास्त काळजी करू नका. अर्धे देणे या महिन्यात व बाकीचे पुढच्या महिन्यात असे त्यांना सांगा पण नको वीस तारखेलाच पूर्ण सांगा. ” दिवाणजींना हर्षवायूच व्हायचे बाकी होते.

“बरे तर, येऊ मी आता? येतो काका” असे वेलजीभाईना म्हणत तो भला माणूस गेला पण.

सर्वांचे चेहरे समाधानाने फुललेले बघून दिवाणजी उत्स्फूर्तपणे म्हणाले, “बऱ्याच दिवसांनी हवेलीत आज आनंद बघून छान वाटले. ”

बोलल्याप्रमाणे रामने वीस तारखेला कामगारांच्या थकबाकीचा एकरकमी चेक दिला. हे काय, कसे यांची तांत्रिक माहिती मला दिवाणजींनी समजावून सांगायचा एक- दोन वेळा

प्रयत्न केला, पण काही कळले नाही. आता तीस तारखे च्या आत कंन्साइनमेंट गेली पाहिजे एवढाच मला ध्यास लागला होता.

दरम्यानच्या काळात, पंधरा ऑगस्टला पंतप्रधानांचे जोशिले भाषण झाले. नेहमीपेक्षा वेगळे म्हणजे भारताच्या संयमाची परीक्षा बघू नये, त्यालाही मर्यादा आहेत. असे त्यांनी ठणकावले. या सर्वाची परिणीती युध्दात होणार याची मला तरी खात्री होती. पण अजूनपर्यंत माझा ठावठिकाणा कोणाला लागू शकला नाही. यावर माझा विश्वास नव्हता नक्कीच बात्रांनी काही दबावतंत्राचा वापर केला असावा.

वीस ऑगस्टला दिवाणजी मी आणि कविता कामगारांच्या थकबाकीची पाकिटे तयार करण्यासाठी एकत्र बसलो. (हो, सत्तरीच्या काळात पगार रोख देण्याची पद्धत होती) सर्व पाकिटे तयार केल्यावर कविताने सुटकेचा निःश्वास टाकला व सुटलो बाबा एकदाचे असे ती म्हणाली. “सुटलो कुठे अजून?” दिवाणजी म्हणाले, “कंन्साइनमेंट वेळेवर दिली पाहिजे. मग मार्केटमधे आपली पत

राहिल. "

“त्यात काही अडचण वाटते का तुम्हाला?”

“बऱ्याच, सर्वात मोठी अडचण म्हणजे डिस्पॅच साठी ट्रक मिळत नाही आहे. ” दिवाणजी म्हणाले, “तसे माझे प्रयत्न चालू आहे पण महिना अखेर पर्यंत कोणालाही वेळ नाही. ”

“याबाबतीत मी तुम्हाला मदत करू शकेन. ” दरवाज्यातून आवाज आला.

आम्ही दरवाज्याकडे बघितले तर बशीर दारात उभा होता. स्वाभाविक प्रतिक्रियेने मी उभा राहू लागताच बशीर मला बसण्याची खूण करत म्हणाला, “विनय बाबू तुम्ही बसूनच बोला. तुम्ही उभे राहिलात की माझे फार नुकसान होते. ”

“ तू आम्हाला काय मदत करणार?” मी म्हणालो.

“मी ट्रक वाहतुकीचा व्यवसाय सुरू केला आहे. म्हणजे तसा आधी करत होतोच पण झटपट पैसे कमावण्याच्या नादात तो बंद पडला होता. ”

“मग आताच ही उपरती का झाली?”

“तुम्ही दिलेल्या फटक्यांमुळे. त्यानंतर माझ्या जवळपास कोणी येत नाही. ईमानदारीत काम मागतो तरी कोणी देत नाही. ”

“आम्ही तरी का विश्वास ठेवावा?” दिवाणजी.

“एकदा ठेवून बघा. नाहीतर विनय बाबू आहेतच. ”

आम्ही तिघांनी एकमेकांकडे बघितले. दोन मिनिटांनी कविता निश्चयानी म्हणाली, “अठ्ठावीस तारखेला सकाळी दहा वाजता ट्रक घेऊन या. ”

नंतर आम्ही कामगारांची पाकिटे वाटण्याचे काम सुरू केले. कामगारांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या आनंदापुढे आम्ही आमच्या सर्व चिंता तेवढ्या करिता तरी विसरलो.

“कविता, बशीरवर विश्वास ठेवण्यात तुझी चुक तर होत नाही ना?” दिवाणजी म्हणाले.

“नाही, अनोळखी लोकांवर पण आपण विश्वास ठेवतोच ना?” माझ्याकडे बघत ती ठामपणे म्हणाली.

या वाक्याचा नक्की काय अर्थ असावा याचा विचार मी करत असतांनाच सर्व कामगारांना परत एकदा व्यक्तीशः भेटून ती गेली पण.

कामगारांनी त्यांचा शब्द पाळला.

बरोबर अठ्ठावीस तारखेला आम्ही डिस्पॅचकरता बशीरच्या ट्रकची वाट पाहू लागलो. ठरल्याप्रमाणे दहा वाजता तो ट्रक घेऊन आला. ट्रक फक्त बांधकामाच्या वाहतुकीसाठी योग्य होता हे दिसतच होते. पण आम्हाला काम होण्याशी मतलब होता.

बशीरपण जरा नीटनेटका होऊन आला होता. साधारणपणे एका तासात ट्रक भरण्यात आला. तेवढयात एका कामगाराची पत्नी पूजेचे ताट घेऊन आली आणि अधिकारवाणीने कविताला म्हणाली,

" दिदी, तुमची ही पहिलीच ऑर्डर आहे. पूजा करा.” हे दिवाणजींचे डोके असावे.

हसतच कविताने ट्रकला हार घातला, पूजा केली व नारळ हाती घेऊन हा कोणाला फोडायला सांगावे या संभ्रमात पडली.

"दिदी, सोचो मत, विनय बाबूंना नारळ फोडायला द्या. त्यांना तोडफोडीची फार प्रॅक्टीस आहे. ” बशीर ओरडून म्हणाला. मी नारळ फोडल्यानंतर दिवाणजी बशीर सोबत बसले व यश कंपनीकडे रवाना झाले.

यानंतरच्या घटना इतक्या वेगाने झाल्या की त्यावर कोणाचे नियंत्रण राहिले नाही. काही विशिष्ट कालावधीनंतर घटना स्वत:ची गती धारण करतात व तुम्ही फक्त साक्षीदार असता असे बात्रा नेहमी म्हणायचे त्याची मला प्रचिती येऊ लागली होती.

यशची कंन्साइनमेंट दिलेल्या तारखेआधीच पूर्ण झाली आहे हे सेठणा साहेबांना सांगण्यासाठी मी मुद्दाम कविताला बरोबर नेले.

यावेळेस पी ए नी अजिबात अडवले नाही. आम्हाला बघून सेठणांचे डोळे आनंदाने लकाकले.

" अरे कविता बेटी तू? छान छान वेलजीभाई कसे आहेत?”

“काका उत्तम आहेत. कंन्साइनमेंट पूर्ण झाली हे सांगण्यासाठी मी आले आहे. ” कविता नम्रपणे म्हणाली.

“त्याची मला खात्री होतीच. ”

“मग आम्ही आता चेक जमा करू?”

“जरूर, जरूर आणि जातेवेळी मेहताजींना भेटा व पुढच्या ऑर्डर्स ची कोटेशन भरा.” नंतर बाकीच्या ऑर्डर्सचा पण ओघ सुरू झाला. माझा फॅक्टरीतला रात्रीचा मुक्काम पण संपला. यातून आता काय नवीन मार्ग काढावा आणि आपला इथला मुक्काम कसा हलवावा याचा मी विचार करू लागलो. कारण कधी ना कधी मी कोण हे या साध्या सरळ लोकांना कळणार होतेच. त्यानंतरची प्रतिक्रिया काय होईल याची परीक्षा मला घ्यायची नव्हती. या घालमेलीत पावसाळा संपला व नोव्हेंबर सुरू झाला.

## युद्धाचे ढग

जसा पावसाळा ओसरू लागला तसे मला बात्रांचे प्रत्येक वाक्य आठवायला लागले. एव्हाना मुक्तीवाहिनीचा प्रतिकार जोरात सुरू झाला होता. इकडे पाकिस्तानला युद्धज्वराने पछाडले होते. उखडून टाकू, नष्ट करू अशा वल्गना सुरू झाल्या होत्या. भारताने स्वत:हून आक्रमण न करण्याचे ठरवले होते. पण दिवसागणिक वाढणारा निर्वासितांचा ओघ आर्थिक योजनांवर बोझ ठरत होत्या. या परिस्थितीत आपण सेनेत असायलाच पाहिजे या विचाराने माझे हात शिवशिवू लागले. पण युद्ध सुरू व्हायच्या आधी माझा उल्लेखपण करायचा नाही ही बात्राचीं अट आठवनू मला गप्प बसावे लागत होते. याआधी आपण निदान वेलजीभाई व कविता यांनातरी आपण कोण आहे हे सांगावे या विचारांनी माझ्या मनात उचल घेतली. एक दिवस (बहुतेक 30 नोव्हेंबर ) मी रात्री ते दोघेच असतांना त्यांच्यापाशी गेलो व त्यांना म्हणालो.

“मला तुम्हाला काही सांगायचे आहे. "

" आत्ता?"

“होय, आत्ताच”.

“बरं, ठीक आहे सांग. ”

अतीगुप्त माहिती सोडून मी सर्व हकीकत सांगून त्यांना म्हणालो, “आता मला राहवत नाही आणि सहन पण होत नाही. तुम्हीच माझा रिपोर्ट करा किंवा वा मीच मुख्यालयात जातो. ” माझे बोलणे संपताच पाच मिनिटे खोलीत शांतता पसरली. नंतर कविता शांतपणे म्हणाली, “यातील रफिकच्या खुनामागाची खरी माहिती सोडल्यास बाकी सर्व वर्तमानपत्रात आले होते. पण तुला बरे नसल्याने तुझ्यापर्यंत आम्ही कोणतीच बातमी येऊ दिली नाही. ” आता थक्क होण्याची पाळी माझी होती.

“म्हणजे तुम्हाला कल्पना असूनपण ...”

“होय आम्हाला कल्पना असून पण आम्ही गप्प राहिलो त्यांची दोन कारणे होती. ”

“कोणती?”

“एक तर तू काकांचे प्राण वाचवले होते आणि दुसरे म्हणजे तू जखमी होतास. नंतर ज्या तडफेनी तू आमचे प्रश्न लागला ते बघून आम्हाला तुझ्याबद्दल विश्वास वाटू लागला. तसेच तू स्वत:हून एक दिवस सारे सांगशील याची आम्हाला खात्री होती. ”

“सविताला हे सर्व माहिती आहे?”

“नसावे. त्याबाबतीत तू नशिबवान आहे कारण ती फक्त फॅशन मॅगझीन्स वाचते.

"मग आता माझ्याबाबत तुम्ही काय निर्णय घेतला आहे?”

थोडा विचार करून कविता म्हणाली, “इतके दिवस तू कळ सोसली आहे तशी अजून एखादा महिना सोसावी असे मला वाटते. बात्रांनी काही विचार करूनच तुला अशी ऑर्डर दिली असेल. नंतर काहीतरी मार्ग निघेलच. ”

“ठीक आहे. ” असे म्हणत मी बाहेर आलो तर सविताच्या खोलीचे दार हळूच बंद होत आहे असे भासले. रहस्यात एक भागीदार वाढला होता.

मला जास्त वाट बघायची गरज पडली नाही. तासाभरातच माझ्या दारावर टकटक असा आवाज आला. " दार उघडेच आहे सविता. तू आत येऊ शकते" मी उठून लाईट ऑन करत म्हणालो.

“तुला कसे कळले की मी आहे?"

" तू आमचे बोलणे चोरून ऐकत होती. तेव्हाच मी तर्क केला होता की मला भेटण्यास येशील म्हणून. ”

“एवढाच हुशार आहे तर मी का आले असेन हे पण सांग. "

"ते तूच सांग. "

“ठीक आहे. मला सर्व इस्टेट पाहिजे आहे. ”

“ती तशीपण तुझीच आहे. ”

“मला अशी नामधारी नको पूर्णपणे माझी हवी. ”

“मग मी काय करू?”

“ तू बरेच काही करू शकतोस. गेले पाच-सहा महिने धडपड करून तुला काय मिळाले? याच गतीने अजून दहा वर्षे लागतील स्थिरसावर व्हायला. ”

“मग तुझा सुपर फास्ट प्लॅन काय आहे?”

“काकांना मार्गातून हटव. ”

“काय?!” मी चमकून म्हणालो.

“का? तुझ्यासारख्या खुन्याला त्यात एवढे आश्चर्य का वाटावे? बघ शांत डोक्याने विचार कर. एवढे काम कर आणि आयुष्यभर निवांत रहा. कविता आणि सवितात सरस कोण हे कळण्याची अक्कल तुला असेलच. ”

या असल्या लोकांच्या रक्षणासाठी आपले सैनिक प्राण देतात मी मनात म्हणालो. पण वरकरणी काही न दर्शविता “सविता प्लॅन तर झकास आहे. पण मला विचार करण्यासाठी पंधरा दिवस दे” असे म्हणालो.

“का, एवढा काय विचार करायचा त्यात?”

“सर्व नैसर्गिक वाटले पाहिजे, नाहीतर माझ्या बरोबर तुलापण हाथकडया पडतील. ”

“ठीक आहे. पण मला दगा देशील तर परिणाम वाईट होईल याचा हे लक्षात ठेव.” असे म्हणनू ती पीडा एकदाची गेली.

ही घटना पण मी कविताला सविस्तर सांगितली. त्यानंतर माझी आणि कविताची जवळीक फारच वाढली. कधी जवळीक सलगीत बदलली आणि सलगीचे रुपांतर प्रेमात झाले ते आमचे आम्हालाच कळले नाही. फक्त परिस्थितीमुळे आम्ही ते उघड केले नाही. योग्य वेळ येताच आपण वेलजीभाईंना सांगू असे कविता म्हणाली. पण त्यांना वेगळे काही सांगायची गरज आहे असे मला तरी भासले नाही कारण आम्ही दोघेही एकत्र दिसताच त्यांचे निळेशार डोळयात समाधानाची छटा दिसायची.

तीन डिसेंबरला आम्ही ब्रेकफास्ट घेत असतांना रेडीओवर पाकिस्तानने भारताच्या अकरा हवाई केंद्रावर हल्ला करून भारतावर युद्ध लादल्याची बातमी प्रसृत झाली. त्यानंतर भारताने जे तडाखेबाज प्रत्युत्तर दिले त्यातच बात्रा व त्यांच्यासारख्या अनेकांचे परिश्रम व पाच सहा वर्षांचे नियोजन असावे हे उघड होते. हे युद्ध आपल्याला झटपट संपवणे जरूरी आहे नाहीतर सर्वकर्ष

युद्ध सुरू होईल आणि त्याचे परिणाम सर्वव्यापी राहतील. हे बात्रांचे उद्गार मला सतत आठवू लागले. ज्या गतीने भारतीय सेना मुसंडी मारीत होती ते बघता हे युद्ध लवकरच निर्णायक रित्या संपवण्याचा भारताचा विचार उघड दिसत होता.

माझी स्थिती मात्र पाण्याबाहेर पडलेल्या मासोळी प्रमाणे झाली होती. यावेळेस आपण सेनेत असायला हवे या विचाराने परत उसळी घेतली होती. दहा डिसेंबरला भारताने ‘बांगलादेश’ ला मान्यता देऊन जागतिक नकाशाच बदलला. आता पाकिस्तानची गत पिंजऱ्यात कोंडलेल्या श्वापदाप्रमाणे झाली होती. प्रश्न युनो त नेऊन ताबडतोब युद्धबंदी करिता त्यांचे प्रयत्न सुरू झाले. पण भारताने चढाईचे धोरण ठेवीत विभाजन प्रक्रीया सुरूच ठेवली.

दरम्यानचा काळ माझ्याकरता फारच कसोटीचा ठरला. कारण इकडे सविताने फारच त्रागा सुरू केला होता. कारण नसतांना काहीतरी खुसपट काढून ती कविताशी उघडपणे भांडत होती. ती माझ्याजवळ काय बोलली हे सर्व मी कविताला सांगताच वेलजीभाईंना कोणत्याही परिस्थितीत एकटे सोडू नये यावर आमचे एक मत झाले. त्यानुसार दिवसा कविता आणि रात्री मी असे वेलजीभाईंजवळ राहू लागलो.

दहा डिसेंबर माझ्या करता फारच वाईट उगवला कारण त्यादिवशीच्या बातम्यामधे ब्रिगेडियर बात्रा यांना वीरगती प्राप्त झाल्याचे प्रसृत झाले.

भारतीय सेनेने ढाक्क्या पर्यंत मुसंडी मारून विजयी दौड पूर्ण केली. आता सर्व मार्ग बंद झाल्याचे बघून जनरल नियाझी यांनी शरणागती पत्करली व दुसऱ्या महायुद्धाच्या नंतर सर्वांत जास्त म्हणजे नव्वद हजार पाकिस्तानी सैनिक युद्ध कैदी झाले आणि सोळा डिसेंबरला युद्ध समाप्त झाले.

आता मात्र माझा धीर सुटला. मी कविताला ताबडतोब दिल्लीला जावून बात्रांच्या पत्नीची भेट घेण्यास तसेच त्यांच्या जवळ माझ्या संदर्भात जे पत्र असेल ते ताब्यात घेण्यास सांगितले. ते जर शक्य झाले नाही तर दिल्ली मुख्यालयात चौकशी करण्यास सांगितले. आवश्यक ते संदर्भ तिला दिले. तिने पण दुसऱ्या दिवशी जायचे ठरविले. त्यादिवशी वातावरण पण खराब होते. नेमके रात्री सविताने पण पैशावरून जेवतांना वाद सुरू केला. कविता आता खंबीरपणे उत्तर देत होती कारण सर्व व्यवहार तिला चांगले ठावूक होते. गेल्या चार महिन्यात व्यवसाय परत उभा करण्यास जो काही पैसा एकवटावा लागत होता त्यामुळे साहजिकच सविताच्या चैनीवर मर्यादा आल्या होत्या आणि त्या तिला अजिबात मान्य

नव्हत्या. एवढेच नव्हे तर त्या कविता जाणूनबुजून तिला त्रास देण्यासाठीच करीत असल्याचे तिचे मत होते. यावर कळस म्हणजे हे सर्व वेलजीभाईच घडवून आणत आहेत असे अजब तर्कट ती लावीत होती.

या वादंगामुळे कविता चा फारच कोंडमारा होत होता. एकीकडे सविताला गप्प करणे, दुसरीकडे माझी चिडचिड आणि शिवाय वेलजीभाईंचे करणे यामुळे ती त्रस्त झाली होती. आजचा वाद फारच झाल्याने ती जेवण झाल्याबरोबर तिच्या खोलीत गेली व दार बंद करून झोपली. इकडे सवितापण पाय आपटत माझ्याकडे आली आणि मला धमकीच्या भाषेत म्हणाली " रात्री दोन वाजता मला टेरेसवर काम झाले हे सांगायलाच भेट. "

मी काही बोलायच्च्या आत ती गेली पण.

आता तिच्या धमक्यांना भीक घालायचे मला काहीच कारण नव्हते. कारण होण्याऱ्या कारवाईला तोंड देण्याची याची माझी मानसिक तयारी झाली होती, म्हणून मी तिला रात्री भेटून एकदाचा सोक्षमोक्ष लावायचा ठरविले. असाच विचार करता करता मी वेलजी भाईंच्या खोलीत बसलो होतो. कधी माझा डोळा लागला तर मलाच कळले नाही.

अचानक दोनच्या दरम्यान मी खडबडून जागा झालो. प्रथम वेलजी भाईंकडे बघितले तर ते शांत झोपले होते. मला हायसे वाटले. फ्रेश होऊन मी टेरेसवर गेलो. टेरेस वापरात नसल्याने तसेच फार जुने बांधकाम असल्याने बराच धोकादायक झाला होता. तसा टेरेस पूर्ण मोकळा होता. त्याची स्कर्टिंग फारच जुनी आणि जेमतेम दोन फूट उंचीची होती. अशी जागा सविताने का निवडावी असा विचार करीत मी टेरेसवर पोचलो. आधी मला जाणवला तो सिगारेटचा वास. नजर तेथील अंधाराला सरावल्यावर दूर अंतरावर सविता सिगारेट ओढीत असतांना दिसली.

जवळ पोचताच मला धुराचा वास पण वेगळाच जाणवला म्हणून मी म्हणालो " सविता, तू कोकेन पण घेतेस काय?"

" तू जेवढ्या कल्पना करू शकतो तेवढे मी सर्व करते " ती गुर्मिने म्हणाली.

" म्हणून तुला सारखे पैसे लागतात"

" त्याच्याशी तुझा काय संबंध? काम झाले की नाही तेवढे बोल".

" झाले नाही आणि मी ते करणार पण नाही. तुला काय करायचे ते कर. "

मी रागाने म्हणालो आणि वळून जाऊ लागलो. तोच तिने माझ्या हाताला धरून तिच्याकडे ओढला आणि ऐकून तर घे असे काहीसे ती बोलत होती तेवढ्यात मी रागाने तिचा हात जोरात झटकला. तो झटका तीच्याकरता फारच जोराचा ठरला ज्यामुळे तिचा तोल जावून ती स्कर्टिंगवर आदळली. आधीच ती नशेत असल्याने तिचा तोल गेला आणि सविता एक अस्फुट किंचाळी. फोडीत सरळ खाली पडली. रात्रीच्या त्या नीरव शांततेत तो आवाज पण बराच मोठा भासला. क्षणभर काय झाले ते मला कळलेच नाही. तिला फक्त बाजुला सारणे एवढाच माझा हेतू होता. खाली ढकलणे, फेकणे हा कधीच नव्हता. मी सुन्न झालो. दोन मिनिटांनी स्वतःला सावरत खाली बघितले. खाली सविताची अंधुकशी निश्चल आकृती दिसत होती. थोड्या आशेनी मी काही हालचाल दिसते काय ते बघितले. पण ते अशक्य आहे हे मला ठाऊक होते कारण खाली फरशी होती. तोच मेन गेट कडून कोणीतरी धावत येत असल्याचे मला दिसले. तो नक्कीच रात्रीचा वॉचमन असणार. आता खाली जावे की इथेच थांबावे असा विचारात मी पडलो. शेवटी मी खाली जाण्याचे ठरविले. त्याआधी उपजत सावधगिरीने माझ्या येथे असल्याच्या काही खाणा खुणा आहे काय हे तपासले आणि खाली आलो.

तेवढ्यात तो माझ्या खोलीपाशी पोचला पण होत आणि मी तेथे नसल्याचे बघून मोठ्याने विनय बाबू, विनय बाबू असे ओरडत होता. तो आरडाओरडा ऐकुन कविता खाली येत होती. तिला बघताच त्याने काहीतरी वरून पडल्याचे सांगितले. ती त्याच्याबरोबर धावत गेली. पाठोपाठ मी पण गेलो.

जवळ जाताच माझी भीती खरी ठरल्याचे मला दिसले. सविताचा निष्प्राण देह खाली पडला होता. तिच्या डोक्यापाशी रक्ताचे थारोळे दिसत होते. ती मरण पावली आहे हे सांगायला डॉक्टर ची गरज नव्हती. ते दृश्य बघून कविता दुःखावेगाने पडलीच असती पण मी तिला कसेबसे सावरले. मी वॉचमनला तेथेच थांबायला सांगितले आणि कशालाही हात न लावण्यास बजावले. कविताला घेवून दिवाणखान्यात आल्यावर मी तिला प्रथम शांत करून पिण्यास पाणी दिले. नंतर डॉक्टर आणि पोलिसांना बोलवावे लागेल हे सांगितले. कसेबसे स्वतःला सावरत तिने पोलीस कशाला असे विचारले. कारण की हा अपघात आहे असे त्यावर मी उत्तरलो. नंतर मी डॉक्टर आणि पोलिसांना फोन केला. दोघांनीही लगेच येतो म्हणून सांगितले. ते येण्यास वेळ होता म्हणून मी कविताजवळ बसलो.

" हे असे कसे झाले विनय?"

आता काय आणि कसे सांगावे, तेही यावेळी हा मला प्रश्नच पडला. तरीपण हिय्या करून मी सर्व सांगितले. नकळत का होईना सविताच्या मृत्यूला मी कारणीभूत आहे हे सरळ कबुल केले.

मी तिच्याकडून बराच त्रागा, संताप अपेक्षित केला होता आणि सद्य परिस्थितीत तो योग्यही ठरला असता. शेवटी तिची सख्खी बहिण गेली होती. क्षणभर स्तब्ध राहून ती हळूच म्हणाली " मग, आता तू काय करायचे ठरविले आहे".

"जे झाले ते पोलिसांना सांगायचे".

मी उत्तरलो.

" ते विश्वास ठेवतील?"

" नाही ठेवणार".

" मग?"

" जन्मठेप किंवा फाशी".

" दुसरा काही पर्याय सुचतो काय? कारण झाला तो अपघात होता याची मला खात्री आहे".

मला चार महिन्या पूर्वीचा प्रसंग आठवला. तेव्हा मी काहीही केले नव्हते आता फक्त निसटता हात लागला होता.

"कितीही जीव तोडून सांगितले तरी माझ्यावर पोलिस विश्वास ठेवणार नाहीत. "

" माझ्याकरता. तू फक्त टेरेसवर गेल्याचा उल्लेख करू नको. मी बहिण गमावली आहे आता मला तुला गमावयाचे नाही".

मी निरुत्तर झालो. नंतर हळूच म्हणालो " मग मी सर्वात शेवटी का आलो आणि दहा मिनिटे कुठे होतो याचे उत्तर काय देणार?"

"काही देऊ नकोस. तुला माझी शपथ आहे. "

एव्हाना रात्रीचे तीन वाजले होते. नंतर जणू काय ठरविल्या सारखे डॉक्टर आणि पोलिस एकदमच आले. तोवर मी दिवाणजींना बोलावले होते. दिवाणजींनी समयसूचकता दाखवून पत्नीला बरोबर आणले होते. त्यामुळे वेलजी भाई कडे कोणी बघायचे हा प्रश्न सुटला.

डॉक्टरांनी सविताला जागेवरच तपासून तिला मृत घोषित केले. इन्स्पेक्टर राकेश चौधरीने पोष्ट मार्टम करिता देह सिटी हॉस्पिटल ला पाठविला. दिवाणजी पण हॉस्पिटल ला गेले.

त्यानंतर राकेश हवेलीत आला. राकेश पंचेचाळीसच्या आसपासचा चांगलाच रापलेला अधिकारी वाटत होता. एवढ्या कालावधीत त्याने कोणालाही काही विचारले नव्हते किंवा तो

स्वतः काही बोलला पण नव्हता. उलट आतापर्यंत त्याची भूमिका मदत करण्याची दिसली. जणू काही हे सर्व त्याला लवकर संपवायचे होते.

आत येताच त्याने कविताजवळ झाल्या प्रकाराबद्दल दुःख व्यक्त केले आणि प्रथम टेरेसची पाहणी केली नंतर सविताच्या खोलीची.

दिवाणखान्यात आल्यावर तो सरळ कविताकडे गेला

व हळूच त्याने तिला विचारले, " कविता, मला खरंच यावेळी तुला त्रास देणे योग्य वाटत नाही पण काही गोष्टी विचारणे भाग आहे".

"विचारा" कविता शांतपणे म्हणाली.

त्याने औपचारिक माहिती विचारून जसे हवेलीत किती जण राहतात, रात्री कोण कुठे होते हे विचारले. तिला आश्वस्त केले. एवढेच नाही तर वेलजी भाईंना पण एवढ्यात काही सांगू नका हा सल्ला पण दिला. शेवटी त्याने इतक्या रात्री सविता टेरेसवर का गेली असावी हे तुला माहिती आहे काय असे विचारले.

“ सिगारेट ओढायला “ कविता शांतपणे म्हणाली.

आता थक्क व्हायची पाळी राकेश ची होती “म्हणजे तुला माहिती होते की..... ” त्याने जाणीवपूर्वक वाक्य अर्धे सोडले.

“ होय, ती ड्रग्स घेते हे मला ठावूक होते. ”

ठीक आहे. तू जाऊ शकतेस असे म्हणून त्याने वॉचमनला बोलावले त्याची जबानी घेतली आणि त्याला घेऊन परत टेरेस वर गेला.

माझी हळूहळू खात्री पटत होत की त्याला माझा संशय आला आहे. हा सर्व माझ्यावरिल मानसिक दबाव वाढविण्याचा प्रकार होता.

साधारण आठच्या दरम्यान दिवाणजींचा येत असल्याचा निरोप आला. एव्हाना लोक जमायला लागली होती. दरम्यानच्या काळात मी कविताला कोणाला कळवायचे आहे काय हे विचारले. पण तिने कोणीही जवळचे नातेवाईक नसल्याचे सांगितले तसेच मलाच सर्व विधी करण्यास सांगितले.

सर्व आटपून जेव्हा अकरा वाजता आम्ही परतलो तेव्हा राकेशने मला बोलावले.

"विनय, काही प्रश्न विचारायचे आहेत"

"जरुर विचारा. "

" हे बघ, माझे सरळ प्रश्न आहेत. मला सरळ उत्तर पाहिजे" तो जरबेने म्हणाला.

" ठीक आहे. "

"मी कविता आणि वॉचमन या दोघांच्याही जबान्या घेतल्या आहेत. तू घटनास्थळी दहा मिनिटे उशिरा का पोचला?"

" मी गाढ झोपलो होतो. "

अचानक त्याने वेगळाच प्रश्न विचारला " तू सिगारेट ओढतोस?"

"नाही"

"सविता सिगारेट ओढते, ड्रग घेते हे तुला ठावूक होते?"

"नाही"

"तुझ्याशी तिचे पटत नव्हते?"

"नव्हते. "

" तू रात्री दोन वाजता टेरेसवर गेला होता?"

"नाही. "

" विनय, तू खोटे बोलत आहेस. कविताने सर्व सांगितले आहे. तू रात्री टेरेसवर गेला होता. तिथे तुमची बाचाबाची झाली. रागाच्या भरात तू तिला खाली फेकले त्यामुळे ती मरण पावली. "

अगदी त्या स्थितीत पण मला राकेश बद्दल आदर वाटला. हा माणूस फार वरती पोचेल असे वाटले.

पण मी शांतपणे असे काहीही झाले नाही एवढेच म्हणालो.

"पण तिचे आणि तुझे पटत नव्हते हे तर खरे आहे?"

"होय. म्हणून काही मी तिला ठार मारणार नाही. शिवाय तिला मारून माझा काय फायदा?"

चेहऱ्यावरची रेघ पण न हलविता तो म्हणाला"असेही होऊ शकते की तुझे काही बिंग तिला माहिती असेल. त्या बदल्यात ती तुझ्याकडून काही काम करून घ्यायला बघत असेल. "

मनातल्या मनात मी या माणसाला कमिशनर करून टाकला. पण वरकरणी तसे काहीही नाही एवढेच म्हणालो. तेवढ्यात सैन्याची एक जीप पोर्च मधे येवून थांबली. त्यातून दोन अधिकारी उतरले. सरळ आमच्या जवळ येत त्यांनी मला विचारले "आम्ही दिल्ली सैनिक मुख्यालया तून आलो आहोत. मी मेजर शर्मा व हे कॅप्टन विनय कश्यप. आम्हाला सेकंड लेफ्टनंट राजेश पवार यांना भेटायचे आहे. "

दोघेही मला ज्येष्ठ असल्याने मी खाडकन उभे राहून सल्यूट ठोकला आणि म्हणालो, " मीच सेकंड लेफ्टनंट राजेश पवार. बोला. मी आपल्यासाठी काय करू शकतो?"

मेजर शर्मा म्हणाले “ आम्हाला काही गोपनीय माहिती विचारायची आहे अर्थात् एकांतात"

हा सर्व प्रकार शांतपणे बघणारा राकेश हळूच पण खंबीरपणे मला म्हणाला " मला तुमच्या भेटीत व्यत्यय आणण्याची इच्छा नाही पण माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. "

पदाने व वयाने ज्येष्ठ असणाऱ्या मेजर शर्मा यांनी नंतर सर्व सूत्रे हातात घेतली. त्यांनी प्रथम राकेशकडून परिस्थिती समजून घेतली आणि त्याला विश्वासात घेवून सैन्याच्या चौकशीची निकड समजावून सांगितली. जर राजेशने गुन्हा केला असेल तर त्याला आम्ही कायद्याच्या हवाली जरुर करू हे पण आवर्जून सांगितले. सर्वांच्या संमतीने चौकशी हवेलीत, माझ्या खोलीतच घेण्याचे ठरविण्यात आले.

नंतर माझी एकटयाची त्यांनी तीन तास कडक तपासणी केली. सर्व घटनाक्रम माझ्याकडून लिहून घेतला. तसेच सर्व प्रश्नोत्तराचे रेकॉर्डिंग केले. अतिगुप्त कारवाया सोडून मी सर्व माहिती सांगितली. तसेच बात्रांनी तीन ठिकाणी रफिकच्या हत्ये पर्यंतचा क्रम व कारणे लिहून ठेवली आहेत. हे ही सांगितले त्यावर त्यांनी मुख्यालयातून मिळालेले पत्र मला दाखवले.

“या पत्रामुळेच ही चौकशी गोपनीय रित्या करण्यात येत आहे. ” ते म्हणाले. आता माझे बरेच टेंशन कमी झाले होते. सर्व प्रश्नोत्तरे थांबल्यावर कॅप्टन विनय कश्यप यांच्याकडे बघत मी विचारले “तुम्हाला मी याआधी बघितल्या सारखे वाटते पण कोठे ते आठवत नाही. ”

“बरोबर आहे. आपण दिल्ली रेल्वे स्टेशनला प्लॅटफॉर्म नं तीन वर भेटलो होतो. ”

“म्हणजे ते पूर्व नियोजित होते. ”

“होय, '' तो म्हणाला, ‘'तुला नवीन आयडेंटीटी व काही पैसे देण्यास बात्रांनी सांगितले होते. तुला व्हिजिटिंग कार्ड, पैसे आणि काही सूचना द्यायच्या होत्या पण त्याच्या आतच तू त्या व्हिलचेअरवरील व्यक्तीला वाचविण्याकरता धावला. ”

म्हणजे बात्रा माझी परोपरीने काळजी घेत होते.

शेवटी दुपारी चारच्या दरम्यान त्यांनी चौकशी पूर्ण झाल्याचे सांगितले आणि काही फोन दिल्लीला केले. तसेच मला एक तास बाहेर थांबायला सांगितले.

आता तासाभरात माझे भवितव्य ठरणार असा विचार करत मी बाहेर आलो. गोपनीयतेची शपथ घेतल्याने मी कोणाशीच बोलू शकत नव्हतो. पण कविताच्या चेहऱ्यावरील चिंता लपत नव्हती.

बरोबर पाच वाजता त्यांनी मला बोलावले आणि निकालपत्र माझ्या हाती ठेवले. त्यात महत्त्वाचे एवढेच नमूद केले होते की काही आकस्मिक परिस्थिती उद्भवल्यामुळे ब्रिगेडियर बात्रा यांनी सेकंड लेफ्टनंट राजेश पवार यांना जी ऑर्डर दिली ती त्यांनी संपूर्णपणे इमानदारीने व निष्ठेने पार पाडली याबद्दल आमची खात्री पटली आहे. गोपनीयता व सुरक्षेच्या कारणास्तव त्यांच्या कार्याचा जाहीर सन्मान करणे शक्य नाही. या पत्राद्वारे त्यांना लेफ्टनंट पदावर बढती देण्यात येत आहे. त्यांनी दिल्ली मुख्यालयात सत्तावीस जानेवारी एकोणीसशे बाहत्तरला रिपोर्ट करावा.

Case is closed.

माझे वाचून होताच मी त्यांना धन्यवाद दिले आणि म्हणालो सर या गोष्टीला फक्त एक दिवस उशीर झाला आहे. साहजिकच मेजर शर्मांनी असे का म्हणतो असे विचारले. त्यावर मी काल रात्रीपासून काय घडले ते काही न लपविता सांगितले.

मेजर शर्मा क्षणभर विचारात पडले नंतर म्हणाले " तुझ्या विरुध्द कसलाही पुरावा नाही, साक्षीदार नाही. जो झाला तो केवळ अपघात होता. स्वतः कविता तुझ्या बाजूने आहे. तू का स्वतःला अपराधी समजतो?"

"कारण मी स्वतःला फसवू शकत नाही. नकळत का होईना तिच्या मृत्युला मी जबाबदार आहे. केवळ कविताने शपथ दिली म्हणून मी गप्प आहे. "

काही न बोलता मेजर शर्मांनी जीपच्या किल्ल्या माझ्याकडे सरकवल्या. एका कागदावर काहीतरी लिहिले व मला देत म्हणाले " बाहेर गाडी उभी आहे. तुला पाहिजे तिकडे जा. जेव्हा गरज वाटेल तेंव्हा या नंबर वर फोन कर. पैसे मिळतील. राकेशला आम्ही बघतो".

दोन्ही त्यांच्याकडे परत करत मी निश्चयाने म्हणालो " सर, न केलेल्या खूनापासून मी गेले चार महिने पळत होतो तेंव्हा माझी मन:स्थिती काय झाली होती हे माझे मला माहिती आहे. आता तर कळत नकळत माझा हात लागून खून झाला आहे. फरार झालो तर मीच खून केला हे गृहीत धरण्यात येईल आणि माझे म्हणणे कोणीच ऐकुन घेणार नाही. सॉरी सर, त्यापेक्षा कायद्याला ठरवू दे माझे काय करायचे ते. "

मेजर शर्मा काही बोलणार तेवढ्यात दारावर टक टक करून राकेश आणि कविता आत आले. मागोमाग बद्रि चहा घेवून आला.

" Welcome interruption" मेजर शर्मा म्हणाले. "मी तुम्हाला बोलावणारच होतो. या बसा. "

राकेश अगदी शांतपणे बसला आणि त्याने कॅप काढून टेबलावर ठेवली. कविता माझ्याजवळ येवून बसली. आता कविता आणि राकेश समोरासमोर होते.

बद्रि सर्वांना चहा देवून गेल्यावर विनयने निकालपत्र राकेश व कविताला वाचायला दिले. राकेशने ते निर्विकारपणे वाचले. नंतर तो फक्त एवढेच म्हणाला "नॉर्मल परिस्थितीत ही आनंदाची बातमी ठरली असती."

आता कविता पुढे सरसावून म्हणाली "आता काय वेगळी परिस्थिती झाली आहे?"

" कविता, तू रात्रीपासून फारच धीराने वागत आहेस. अजून काही सांगून तुझ्या दुःखात भर घालणे मला बरोबर वाटत नाही पण सांगायलाच हवे."

"सांगा काय ते. "

" सविताचा अपघात झाला नसून तिचा राजेशने खून केला आहे. "

" हे तुम्ही कशाच्या आधारावर म्हणता?"

" एकतर वॉचमन आला तेंव्हा तो खोलीत किंवा वेलजी भाई जवळ नव्हता आणि घटनास्थळी तो सर्वात शेवटी आला. ही पंधरा मिनिटे तो कुठे होता याचे तो उत्तर देत नाही. मी स्वतःच्या

खोलीतच झोपलो होतो हेच तो सांगत आहे. जे पूर्ण खोटे आहे हे तो जाणून आहे पण तो खरे सांगत नाही. "

कविता शांतपणे म्हणाली, " तुम्ही त्याला कितीही आणि कशाही प्रकारे विचारले तरी तो ते सांगणार नाही. "

"का?"

"कारण तो रात्री दिड ते सव्वादोन माझ्याबरोबर माझ्या खोलीत होता. वॉचमन ओरडत आला तेंव्हा राजेश माझ्या खोलीत होता. तो आधी खाली आला असता तर वॉचमनला हा वरच्या मजल्यावर काय करत होता हा संशय आला असता. त्याला हे कळू नये म्हणून मी आधी खाली आले. माझी बदनामी होऊ नये म्हणून राजेश तुमच्याशी खोटे बोलत आहे."

हे ऐकताच खोलीत एकदम शांतता पसरली. सर्वप्रथम तिचा भंग राकेशने केला. त्याने शांतपणे टेबलावरील कॅप उचलून डोक्यात घातली. पेपर्स गोळा केले उठला व दरवाज्याकडे चालू लागला. दरवाज्यापाशी पोचताच मागे वळून सर्वांना उद्देशून तो एवढेच म्हणाला

"माझी खात्री पटली आहे की सविताचा मृत्यू अपघाती होता."

## परत सेनेत

नंतरचा महिना फार धामधुमीत गेला. विशेष म्हणजे कविता अगरवाल सौ कविता राजेश पवार झाल्या. लग्न समारंभ साधाच झाला. त्या आधी आबांना नातसून दाखवायला मी कोल्हापूरला जाऊन आलो. त्यांना कविता बघताक्षणीच आवडली. वेलजीभाईंचा विचार करून लग्न सज्जनपुरला करण्याची संमती त्यांनी दिली. लग्नाला मोजके लोक होते. ज्यांत सेठणा साहेब, राम साठे ही वरपक्षाची माणसे होती. लग्नानंतर कविताने व्यवसाय बघण्यासाठी व वेलजीभाईंची देखभाल करण्यासाठी सज्जनपूरला रहायचे ठरले. आबांना कविताने कसे मनवले माहीत नाही. पण ते वर्षातून चार महिने तरी सज्जनपूरला राहतील हेही त्यांनीच मला सांगितले.

माझे खरे नांव व त्यामागचा इतिहास कळल्यावर बशीरने माझे नामकरण ' छुपा रुस्तम ' असे केले.

मी जाणार म्हणून दिवाणजींना मनापासून वाईट वाटले पण कविता येथेच राहणार आहे हे कळल्यावर बरे वाटले. हा माणूस कोणीतरी वेगळाच आहे हे त्यांना सुरवातीपासून जाणवत होते असे

ते कविता जवळ बोलले. कविताने भले झाले म्हणून त्या भल्या माणसाला मनापासून आनंद झाला.

मिळालेल्या आदेशानुसार मी सत्तावीस जानेवारीला दिल्ली मुख्यालयात मुव्हींग ऑर्डर घेण्यासाठी दाखल झालो. तेथील ऑफिसरने सुरवातीचे सोपस्कार पार पडल्यानंतर एक जाडजूड पाकीट माझ्या हाती दिले. “यात सर्व आवश्यक कागदपत्रे व सूचना आहेत. तुम्हाला बहात्तर तासाच्या आत अगरताला मुख्यालयात मेजर जनरल बात्रांना रिपोर्ट करायचा आहे.” तो म्हणाला.

“म्हणजे बात्रा? ……” हे वाक्य मी मोठ्या प्रयासाने ओठी येण्याच्या आत थांबवले आणि मला झालेला आनंद चेहऱ्यावर न दर्शविता शांतपणे पाकीट घेतले व परत बात्रांना रिपोर्ट करण्यासाठी निघालो.

जेथे जातो तेथे। तू माझा सांगाती ।

चालविसी हाती । धरोनिया ॥१॥

चालो वाटे आम्ही । तुझाची आधार ।

चालविसी भार । सवे माझा ॥२॥

बोलो जाता बरळ । करीसी ते नीट ।


नेली लाज, धीट । केलो देवा ॥३॥

तुका म्हणे आता । खेळतो कौतूके ।


जाले तुझे सुख । अंतर्बाही ॥४॥

संत तुकाराम

# जगदिश खांदेवाले: एक जबरदस्त लेखक




जगदिश खांदेवाले यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके. बाजूच्या कव्हरवर फ़क्त एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.



## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १३ वे वर्ष.

## जगदिश खांदेवाले यांचे हे तिसरे पुस्तक.

जगदिश खांदेवाले यांच्या कथा वास्तवाशी जवळिक साधणाऱ्या, मनोरंजक आणि विषयांचे वैविध्य राखणाऱ्या असतात. ते लिहितात कमी. पण जे लिहितात ते सकस, जोमदार आणि भरीव असते. त्यांच्या पुस्तकांवर असंख्य वाचकांचा प्रतिसाद येतो आणि त्यात एक गोष्ट आवर्जून सांगितली जाते. ती म्हणजे "तुमचे पुस्तक हातात घेतल्यावर पुर्ण केल्याखेरिज खाली ठेवता येत नाही". त्यांच्या पुस्तकांना भरपुर मागणी आहे. पण ते अत्यंत मेहनतीने लिहीलेली आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(२ पुस्तके), शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर (४ पुस्तके), डॉ. स्मिता दामले (७ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२६ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत),

श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक(३), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(७), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(६), आनंद देशपांडे(२), डॉ. निलीमा कुलकर्णी(२), अनामिका बोरकर(३), अरुण फडके असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमुर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।